दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २७९ । गुरुवार, दि.२३ जुलै २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## पिकअप व दुचाकीचा समोरासमोर अपघात; तरूण ठार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**ममदापूर :** राहाता तालुक्यातील ममदापूर येथे पिकअप वाहन आणि दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असून, हि घटना बुधवारी दुपारी घडली आहेत.या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ममदापूर परिसरात पिकअप वाहन व टीव्हीएस स्टार सिटी दुचाकी (क्र. एमएच १७ सीपी १७४०) या दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली.हा अपघातात इतका भीषण होती की,

(उर्वरीत पान ४ वर)

## महत्वाचे...

### एमडी ड्रग्ज प्रकरण: आणखी तिघे अटक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** मिस्कीन मळा येथे तोफखाना पोलिसांनी ३१ लाख रुपये किमतीचे १५४ ग्रॅम मेफेड्रोन पकडल्याच्या प्रकरणात स्थानिक पातळीवर मेफेड्रोनची विक्री करणाऱ्या आणखी तीन संशयितांना तोफखाना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अली शकील शेख (वय १९ वर्षे, रा. गोविंदपुरा), दानिश फारुख शेख (वय २९ वर्षे, रा. जुना घासगल्ली, तांबटकर गल्ली) आणि कासिफ सज्जाद खान (वय २६ वर्षे, रा. जुना मुकुंदनगर) अशी तिघांची नावे आहेत. त्यांच्याकडे सखोल चौकशी सुरू असून, शहरातील ड्रग्जच्या स्थानिक वितरणाचे रॅकेट समोर येण्याची शक्यता आहे.

तोफखाना पोलिसांनी स्विफ्ट कारमधून जाणाऱ्या जिशान शौकत सय्यद, रिहान जावेद शेख (दोघे रा. मुकुंदनगर) आणि वसिम खलील बागवान (रा. पिंजार गल्ली) या तिघांना अटक करून मोठी कारवाई केली होती. त्यांच्याकडे खेळण्यातील पिस्तूल, चाकू व इतर साहित्यही सापडले होते. सध्या ते २४ जुलैपर्यंत पोलिस कोठडीत आहेत. या कारवाईवेळी मुख्य संशयित जमीर निसार शेख हा कारमधून पळून गेला होता. जमीरनेच हे ड्रग्ज आणल्याचे तपासात निष्पन्न झाले असून त्याच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

# कर्जमाफीची पहिली यादी केवळ ५३३ शेतकऱ्यांची!

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पहिली यादी जाहीर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचा आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचा मुहूर्त साधत राज्य सरकारने आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी पहिली यादी जाहीर केली. राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याची घोषणा सरकारने केली होती. मात्र पहिली यादी केवळ ५३३ शेतकऱ्यांची जाहीर करण्यात आली आहे. करदाते शेतकरी अपात्र ठरविण्यासाठी आवश्यक असलेली माहिती प्राप्तिकर विभागाकडून अद्याप मिळालेली नसल्यामुळे संपूर्ण यादी जाहीर करता आली नसल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रातिनिधीक स्वरूपात सात जिल्ह्यातील निवडक ५३३ पात्र लाभार्थ्यांची २ कोटी ९९ लाख ३७ हजार ५४० रुपयांच्या कर्जमाफीची पहिली यादी जाहीर केली. करदाते शेतक-यांची माहिती प्राप्तिकर विभागाकडून मिळाली नसल्यामुळे संपूर्ण यादी जाहीर करता आली नसल्याची माहिती यावेळी देण्यात आली.



**सोलापूर जगद्गुरु संत तुकोबारायांच्या दिंडीचे सोलापूर जिल्ह्यात स्वागत करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**

(उर्वरीत पान ४ वर)

# विद्यार्थ्यांच्या लढ्याला अण्णा हजारेंची साथ!

## नीट पेपरफुटी प्रकरणी उद्या वाडिया पार्क येथे मौन आंदोलन



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नीट पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला आता ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ अण्णा हजारे बुधवारी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत अहिल्यानगर येथील वाडिया पार्कमधील गांधी स्मारकासमोर मौन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनस्थळाला प्रतीकात्मक स्वरूपात नगरचे जंतर-मंतर असे नाव देण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.नीट पेपरफुटी प्रकरणी गेल्या महिनाभरापासून कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन सुरू आहे. सोमवारी विद्यार्थ्यांनी संसदेकडे मोर्चा काढल्यानंतर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जमुळे देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. या घटनेनंतर विद्यार्थी आंदोलनाला विविध स्तरांतून पाठिंबा मिळू लागला आहे. अण्णा हजारे यांनी सरकारने विद्यार्थ्यांशी तातडीने संवाद साधून त्यांच्या न्याय्य मागण्यांवर निर्णय घ्यावा, असे आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांवरील कारवाईऐवजी त्यांच्या प्रश्नांचे समाधानकारक निराकरण करणे ही सरकारची जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, या आंदोलनाला राजकीय पाठिंबाही वाढत आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलनकर्त्यांची भेट घेतली, तर शरद पवार यांनीही आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राहुल गांधी यांनीदेखील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला समर्थन दिले आहे. अण्णा हजारे प्रत्यक्ष आंदोलनाच्या मैदानात उतरत असल्याने नीट पेपरफुटी प्रकरणावरील जनआंदोलनाला नवे बळ मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, उद्याच्या मौन आंदोलनाकडे राज्यासह देशाचे लक्ष लागले आहे.

# धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा, पंतप्रधानांची माफी हवी... राहुल गांधी यांची मागणी

## मनोज जरांगे, उद्धव ठाकरे यांच्यासह दिग्गजांचा विद्यार्थ्यांना पाठिंबा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटी प्रकरणावरून राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला आता राष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर आणि केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल करत शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांचा तत्काळ राजीनामा, विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईची चौकशी आणि पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी, अशा तीन प्रमुख मागण्या केल्या.



राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत दावा केला की, गेल्या दहा वर्षांत १५२ हून अधिक पेपरफुटीच्या घटना घडल्या

(उर्वरीत पान ४ वर)

### उद्धव ठाकरे म्हणाले...

आता केवळ धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा पुरेसा नाही; या सरकारलाच सत्तेवरून हटविण्याची वेळ आली आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांची भेट घेतल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या संघर्षाला पाठिंबा व्यक्त केला. त्यांनी आम आदमी पक्षाचे समन्वयक अरविंद केजरीवाल, राहुल गांधी आणि काँग्रेस नेत्यांशीही चर्चा करून पुढील आंदोलनाची रणनीती ठरविण्याचे संकेत दिले.

### मनोज जरांगे यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

कोणत्याही परिस्थितीत जंतर-मंतर सोडू नका. जागा सोडली तर सरकार आंदोलन मोडून काढेल. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनस्थळी भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्यास देशभरातील जनतेचा पाठिंबा त्यांच्या पाठीशी राहील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. विद्यार्थ्यांवर पुन्हा कारवाई झाल्यास महाराष्ट्रात तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# सहा फुटीर खासदारांना सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

## शिंदे यांच्यासह बंडखोरांच्या अडचणीत वाढ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** शिवसेनेच्या ठाकरे गटातून ६ खासदारांनी मोठी बंडखोरी केली. या खासदारांनी लोकसभा अध्यक्षांना पत्र देत स्वतंत्र गट स्थापनेची मागणी केली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी या गटाला मान्यता दिली. या खासदारांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. हा उद्धव ठाकरे यांना मोठा झटका होता. ६ खासदारांनंतर विधान परिषदेचे उपसभापती म्हणून सचिन आहिर यांनी थेट अर्ज भरला. शिवसेना ठाकरे गटातून बंडखोरी केलेल्या ६ खासदारांना मोठा दणका बसला. आता लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात याचिका दाखल करण्यात आली. ठाकरेंच्या फुटीर खासदारांना थेट सुप्रीम कोर्टाने नोटीस पाठवली आहे. लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकेला उत्तर देण्याबाबतही कोर्टाने आदेश दिले आहेत. ६ फुटीर खासदारांच्या अडचणीत मोठी वाढ झाली.

(उर्वरीत पान ४ वर)

# १५ दिवसांच्या जमावबंदीचे कारण काय?

## आ. रोहित पवारांचा सरकारला सवाल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** मुंबईत २३ जुलैपासून लागू करण्यात आलेल्या १५ दिवसांच्या जमावबंदीच्या आदेशावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या निर्णयावरून थेट राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. सरकारला कसली भीती वाटतेय? तरुणाईला घाबरलात का? असा थेट सवाल करत रोहित पवारांनी सरकारवर टीकास्त्र सोडले. मुंबई पोलिसांनी कायदा व सुव्यवस्थेचे कारण पुढे करत २३ जुलै ते ६ ऑगस्ट दरम्यान विविध कलमांतर्गत जमावबंदी लागू केली आहे. या आदेशानुसार ५ किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना परवानगीशिवाय एकत्र जमण्यास, मोर्चे काढण्यास किंवा सभा घेण्यास मनाई करण्यात आली आहे.



मग २०२९ पर्यंत जमावबंदी किंवा कर्फ्यू घोषित करा- २३ जुलै पासून ६ ऑगस्ट पर्यंत मुंबईत ५ पेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास रोखणाऱ्या जमावबंदीचे आदेश लागू करण्याचं कारण काय?सरकारला कसली भीती वाटतेय? तरुणाईला घाबरलात का? तरुणाईचा आवाज दाबायचं ठरवलंच असेल तर केवळ ६ ऑगस्टपर्यंत जमावबंदी घोषित न करता २०२९ पर्यंत जमावबंदी किंवा कर्फ्यू घोषित करा, कारण त्यानंतर तरुणाईच तुमच्या सरकारला पायउतार करणार आहे. असे रोहित पवार यांनी म्हटले आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे मुंबईतून दिल्लीमध्ये पोहोचले आणि त्यांनी दिल्लीमध्ये जंतर-मंतरवर आंदोलन

(उर्वरीत पान ४ वर)

# सोनम वांगचुक यांची उपोषण सोडण्याची तयारी

**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जंतर-मंतर येथे गेल्या २० दिवसांहून अधिक काळ उपोषण करणारे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी केंद्र सरकारसमोर उपोषण मागे घेण्यासाठी तीन महत्त्वाच्या अटी ठेवल्या आहेत. दिल्ली पोलिसांनी न्यायालयाच्या निर्देशानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असून, सरकारकडून चर्चेला सुरुवात झाल्यानंतर त्यांनी केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि डॉ. जितेंद्र सिंह यांना पत्र पाठवून आपल्या भूमिका स्पष्ट केल्या आहेत.वांगचुक यांनी पत्रात म्हटले आहे की, नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना योग्य नुकसानभरपाई द्यावी, शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याबाबत संसदेत अर्थपूर्ण चर्चा व्हावी आणि २० जुलै रोजी झालेल्या 'चलो संसद' आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांवर कोणतेही गुन्हे दाखल करू नयेत किंवा त्यांच्यावर दडपशाही करू नये. या मागण्यांबाबत सरकारने स्पष्ट हमी दिल्यासच आपण उपोषण मागे घेऊ, अन्यथा आंदोलन सुरूच राहील, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

वांगचुक यांच्या म्हणण्यानुसार, विविध राजकीय पक्षांतील सुमारे ६५ खासदारांनी त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत सरकारकडून ठोस आश्वासन मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, ज्येष्ठ समाजसेवक

(उर्वरीत पान ४ वर)

# मढीत साधू महिलेसह नग्नावस्थेत!

## सरपंच मरकड यांनी व्हायरल केला व्हिडिओ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव :** अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र मढी येथील श्री चैतन्य कानिफनाथ मंदिर परिसरात एका कथित साधूला एका महिलेसमवेत बाथरूममध्ये आक्षेपार्ह अवस्थेत आढळल्याचा प्रकार समोर आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.स्थानिक नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मंदिर परिसरातील बाथरूममध्ये संबंधित साधू व महिला एकत्र आढळून आले. या घटनेचा व्हिडिओ मढीचे सरपंच संजय मरकड यांनी समाजमाध्यमांवर प्रसारित केल्याचे सांगितले जात आहे. व्हिडिओ समोर आल्यानंतर




(उर्वरीत पान ४ वर)

# जंतर मंतरच्या आंदोलकांची भूक भागवतायत 'अदृश्य हात'

## देशभरातून पिझ्झा, बर्गरसह जेवणाची ऑर्डर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** जंतर मंतरवर धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी सीजेपीकडून आंदोलन केलं जात आहे. या आंदोलनात देशभरातून विद्यार्थी आणि आंदोलक आले आहेत. या आंदोलकांसाठी देशभरातून ऑनलाइन फूड डिलिव्हरीच्या ऑर्डर पाठवल्या जात आहे.

अनेक फूड डिलिव्हरी कंपन्यांना देशाच्या कानाकोपऱ्यातून ऑर्डर येत असून त्याचा पत्ता जंतर मंतरचा दिला जात आहे. दिवसा आणि रात्रीही फूड डिलिव्हरी करणारे डिलिव्हरी बॉय आंदोलकांना पिझ्झा बर्गर आणून देत आहेत. कनॉट प्लेसमधील वेगवेगळ्या रेस्टॉरंटमध्ये मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन ऑर्डरमध्ये वाढ झालीय. या ठिकाणी मुंबई, हैदराबाद, दिल्लीसह इतर राज्यांमधून जंतर मंतरसाठी ऑर्डर दिल्या जात आहेत. डिलिव्हरी बॉयना जंतर मंतरवर कोणत्याही आंदोलकाला हे जेवण किंवा पदार्थ द्या असं सांगण्यात येत आहे.

दिल्लीतील एका डिलिव्हरी बॉयने सांगितलं की, जंतर मंतरवर किमान १० ऑर्डर दिल्या आहेत. माझ्यासोबत इतर काही सहकारी आहेत तेसुद्धा जंतर मंतर परिसरातच ऑर्डर घेऊन येतायत. या ऑर्डर देशातील वेगवेगळ्या ठिकाणाहून आल्या आहेत. मात्र पत्ता जंतर मंतरचा आहे.जंतर मंतरवर सुरू असलेल्या आंदोलकांसाठी पिझ्झा, बर्गर, समोसा, जेवण यासह इतर खाद्यपदार्थ पाठवले जात आहेत. एका डिलिव्हरी बॉयचा व्हिडीओसुद्धा व्हायरल होत आहे. भरपावसात आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना जेवणाचं पाकिट देताना डिलिव्हरी बॉय म्हणतो की मुंबईतील एका व्यक्तीनं पेमेंट केलं असून जंतर मंतरवर द्यायला सांगितलं आहे.

आंदोलनाच्या ठिकाणी आत आणि बाहेर जाणाऱ्या मार्गावरही लोकांनी पाणी, कोल्ड्रिंक, आइसक्रिम, बिस्कीट, फळे, बिर्याणी, ज्यूससह अनेक स्टॉल लावले आहेत. काही लोक फिरून खाद्यपदार्थ आणि पाणी वाटप करत आहे. एका तरुणीने तिचं अर्ध्या दिवसाचं वेतन पाणी बॉटल वाटपासाठी खर्च केल्याचं सांगितलं.



# लाचखोरीप्रकरणी पोलीस अंमलदार दिनेश राठोड निलंबित

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शेवगाव येथील बहुचर्चित शेअर मार्केट घोटाळ्याच्या तपासात लाचखोरीचा प्रकार समोर आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात लाच मागितल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आर्थिक गुन्हे शाखेचा पोलीस अंमलदार दिनेश राठोड याला चौकशीअंती तडकाफडकी निलंबित केले आहे. तर दुसरीकडे, या प्रकरणात नाव समोर आलेले उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश उगले यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागात गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्याची मागणी फिर्यादींनी केली आहे.

शेवगाव येथील शेअर मार्केटमध्ये जादा परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली होती. या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. मात्र, तपास करताना फिर्यादी यशवंत पाटेकर यांनाच आरोपी करण्याची भीती दाखवून पैशांची मागणी करण्यात आली. अंमलदार दिनेश राठोड याने व्हॉट्सअॅप कॉल करून वरिष्ठांच्या नावाने लाच मागितल्याचा आरोप फिर्यादींनी केला आहे.

दरम्यान, एका गाडीत बसून दोन लाख रुपयांची लाच स्वीकारल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओत डीवायएसपी गणेश उगले यांच्या नावाचा उल्लेख असल्याने पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली आहे. त्यामुळे राठोड याच्या निलंबनानंतर आता गणेश उगले यांच्यावरही गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# सीईटीए : विकसित भारताच्या आर्थिक झेपेला नवी दिशा

विशेष संपादकीय — करण नवले (संपादक)

भारत आणि ब्रिटन यांच्यात झालेला सर्वंकष आर्थिक व व्यापार करार (सीईटीए) हा केवळ दोन देशांमधील व्यापार वाढविणारा करार नाही, तर भारताच्या जागतिक आर्थिक धोरणातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय संकल्पनेला प्रत्यक्ष आकार देणाऱ्या महत्त्वाच्या निर्णयांपैकी हा एक मानला जाईल. गेल्या काही दशकांत भारताने पूर्व आशियाई देशांसोबत आर्थिक संबंध मजबूत केले; तर ब्रिटन युरोपीय आर्थिक व्यवस्थेचा भाग राहिला. बदलत्या जागतिक परिस्थितीत दोन्ही देशांनी नव्या आर्थिक भागीदारीचा स्वीकार करून भविष्यकालीन विकासाचा मार्ग निवडला आहे.

जागतिक व्यापारात आज स्पर्धा केवळ उत्पादनांची राहिलेली नाही, तर बाजारपेठ, तंत्रज्ञान, कौशल्य, सेवा आणि मानवी संसाधनांचीही आहे. भारताकडे मोठी लोकसंख्या, कुशल मनुष्यबळ, उत्पादन क्षमता आणि वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. ब्रिटनकडे वित्तीय सेवा, संशोधन, तंत्रज्ञान आणि जागतिक बाजारपेठेतील मजबूत नेटवर्क आहे. या दोन्ही शक्तींची सांगड घालण्याचे काम सीईटीए करतो.

या कराराचा सर्वात मोठा लाभ म्हणजे भारतीय निर्यातीला ब्रिटनच्या बाजारपेठेत जवळपास ९९ टक्के शुल्कमुक्त प्रवेश मिळणार आहे. वस्त्रोद्योग, तयार कपडे, चामडे, पादत्राणे, दागिने, खेळणी, क्रीडा साहित्य, प्रक्रिया केलेले अन्न, सागरी उत्पादने यांसारख्या श्रमप्रधान क्षेत्रांसाठी ही सुवर्णसंधी आहे. विशेष म्हणजे ही क्षेत्रे ग्रामीण व निमशहरी भारताशी निगडित आहेत. त्यामुळे या कराराचा लाभ केवळ मोठ्या उद्योगांना नव्हे, तर सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, कारागीर, महिला उद्योजक आणि लाखो कामगारांनाही मिळू शकतो.

आज भारताला सर्वाधिक गरज आहे ती रोजगारनिर्मितीची. उत्पादनवाढ आणि निर्यातवाढीमुळे नवीन उद्योग उभे राहतील, उत्पादन वाढेल आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील. ब्रिटनची १५० अब्ज डॉलरपेक्षा अधिक मूल्याची बाजारपेठ भारतीय उद्योगांसाठी खुली होणे ही मोठी आर्थिक संधी आहे. चीन, बांगलादेश आणि िहएतनाम यांच्याशी स्पर्धा करण्याची क्षमता भारतीय उद्योगांना यामुळे मिळू शकते.

या कराराचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सेवा क्षेत्राला मिळालेली चालना. माहिती तंत्रज्ञान, वित्तीय सेवा, शिक्षण, स्थापत्य, अभियांत्रिकी, सल्लागार सेवा, दूरसंचार अशा अनेक क्षेत्रांमध्ये भारतीय व्यावसायिकांना ब्रिटनमध्ये अधिक संधी उपलब्ध होतील. भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा बनलेल्या सेवा क्षेत्रासाठी हा करार अत्यंत महत्त्वाचा आहे.

यासोबतच दुहेरी सामाजिक सुरक्षा अंशदान करार हा भारतीय व्यावसायिकांसाठी मोठा दिलासा आहे. अल्पकालीन कामासाठी ब्रिटनमध्ये जाणाऱ्या भारतीय कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कंपन्यांना पाच वर्षांपर्यंत सामाजिक सुरक्षा निधी भरण्यापासून सूट मिळणार आहे. दरवर्षी सुमारे ६०० दशलक्ष डॉलरचा आर्थिक भार कमी होणार असून जवळपास ७५ हजार भारतीय व्यावसायिकांना त्याचा थेट फायदा होईल. ही तरतूद भारतीय कंपन्यांची स्पर्धात्मकता वाढविणारी ठरेल.

विशेष म्हणजे हा करार केवळ उद्योग आणि व्यापारापुरता मर्यादित नाही. भारतीय योग प्रशिक्षक, शेफ, शास्त्रीय संगीत कलाकार अशा सांस्कृतिक क्षेत्रातील व्यावसायिकांसाठीही दरवर्षी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. म्हणजेच भारताची सांस्कृतिक ताकदही आर्थिक मूल्यामध्ये रूपांतरित करण्याचा प्रयत्न या करारातून दिसून येतो.

तथापि, कोणताही मुक्त व्यापार करार हा संधीसोबत आव्हानेही घेऊन येतो. शुल्कमुक्त बाजारपेठ उपलब्ध झाली म्हणजे यश आपोआप मिळेल, असे नाही. भारतीय उद्योगांना गुणवत्ता, वेळेवर पुरवठा, जागतिक मानके, तंत्रज्ञान आणि उत्पादकता या बाबतीत स्वतःला अधिक सक्षम करावे लागेल. विशेषतः सूक्ष्म व लघुउद्योगांना वित्तपुरवठा, आधुनिक यंत्रसामग्री, कौशल्य प्रशिक्षण आणि निर्यात प्रक्रियेतील सुलभता उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी असेल.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे कृषी आणि दुग्धव्यवसायासारख्या संवेदनशील क्षेत्रांचे संरक्षण. या करारात भारताने आपल्या शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून अनेक संवेदनशील उत्पादने करारातून वगळली आहेत किंवा त्यांच्यासाठी टप्प्याटप्प्याने बाजार खुला करण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे मुक्त व्यापार आणि राष्ट्रीय हित यांचा योग्य समतोल राखण्याचा प्रयत्न दिसून येतो.

सरकारी खरेदीमध्ये भारतीय एमएसएमईंना प्राधान्य कायम ठेवणे, बौद्धिक संपदा हक्कांमध्ये राष्ट्रीय हिताचे संरक्षण करणे आणि पर्यावरण, कामगार हक्क, भ्रष्टाचारविरोध, लिंग समभाव यांसारख्या आधुनिक व्यापार मूल्यांचा स्वीकार करणे हीदेखील या कराराची बलस्थाने आहेत. त्यामुळे हा करार केवळ आर्थिक नव्हे, तर संस्थात्मक सुधारणा आणि शाश्वत विकासाचाही मार्ग दाखवतो.

आज जगात पुरवठा साखळ्यांचे पुनर्रचना सुरू आहे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या चीनवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा वेळी भारताने विश्वासार्ह उत्पादन केंद्र म्हणून स्वतःची ओळख निर्माण करण्याची ही योग्य वेळ आहे. ब्रिटनसोबतचा हा करार भारताला युरोपियन बाजारपेठेकडे अधिक प्रभावीपणे पोहोचण्याचा मार्ग खुला करू शकतो.

सीईटीए हा शेवट नसून एका नव्या प्रवासाची सुरुवात आहे. करारावर स्वाक्षऱ्या करणे ही पहिली पायरी असते; खरी परीक्षा त्याच्या प्रभावी अंमलबजावणीत असते. उद्योग, सरकार, निर्यातदार, राज्य सरकारे आणि कौशल्य विकास संस्था यांनी समन्वयाने काम केल्यासच या कराराचे लाभ सर्वसामान्य भारतीयांपर्यंत पोहोचतील.

'विकसित भारत २०४७' हे केवळ घोषवाक्य नसून आर्थिक आत्मनिर्भरता, जागतिक स्पर्धात्मकता आणि सर्वसमावेशक विकासाचे ध्येय आहे. भारत-ब्रिटन सीईटीए हा त्या दिशेने टाकलेला ठोस आणि दूरदृष्टीचा टप्पा आहे. आता आवश्यक आहे ती वेगवान अंमलबजावणी, उद्योगांची तयारी आणि जागतिक संधींचे भारतीय सामर्थ्यात रूपांतर. ते साध्य झाले, तर हा करार भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड ठरेल.

# कला शिक्षक भरतीतील तुटपुंज्या जागांमुळे संताप

## अभियोग्यता धारकांचा आमरण उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेत कला शिक्षकांच्या अत्यल्प जागा उपलब्ध करून दिल्याने कला शिक्षक अभियोग्यता धारकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, तातडीने भरती न झाल्यास आमरण उपोषण आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. पवित्र पोर्टलद्वारे राज्यात सुमारे १८ हजार शिक्षकांची भरती होत असली तरी कला शिक्षकांच्या मोजक्याच जागा नोंदविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार ५०१ व त्यापेक्षा अधिक विद्यार्थीसंख्या असलेल्या शाळांमध्ये कला शिक्षकांचे पद भरणे बंधनकारक आहे. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ-२०२०) अंतर्गत कला व कार्यानुभव विषयांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. तरीही अनेक शैक्षणिक संस्थांनी संचमान्यतेत पदे उपलब्ध असूनही पवित्र पोर्टलवर त्यांची नोंद केली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

२०१२ पासून कला शिक्षक भरती झालेली नसल्याने विद्यार्थ्यांना दर्जेदार कला शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. याबाबत शिक्षणमंत्री, लोकप्रतिनिधी आणि शिक्षण विभागाकडे वारंवार निवेदने देऊनही ठोस कारवाई न झाल्याचा आरोप करत, शासनाने तातडीने कला शिक्षकांची पदे भरावीत, अन्यथा राज्यव्यापी आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा कला शिक्षक अभियोग्यता धारकांनी दिला आहे.

> शालेय शिक्षण मंत्र्यांनी तातडीने सध्या सुरू असलेला शिक्षक भरतीला स्थगिती देऊन कला शिक्षक अभियोग्यता धारक यांचा प्रश्न मार्गी लावावा अन्यथा राज्यव्यापी आमरण उपोषण सुरू केले जाईल.
>
> **हेरेश्वर साळवे**
> **कलाशिक्षक अभियोग्यताधारक**

> शालेय शिक्षण विभागातील सर्व अधिकारी, प्रधान सचिव, शिक्षण उपसचिव, राज्य शिक्षण आयुक्त आणि माध्यमिक शिक्षण संचालक यांनी १५ मार्च २०२४ च्या संचमान्यता निकषांचे उल्लंघन करणाऱ्या शैक्षणिक संस्थांवर कठोर कारवाई न केल्यास महाराष्ट्रातील सर्व कलाशिक्षक अभियोग्यताधारक पुन्हा एकदा आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारतील, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच कला शिक्षक भरतीप्रकरणी न्याय मिळविण्यासाठी कायदेशीर मार्गाचाही अवलंब करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.
>
> **महेश मोरे,**
> **विभागीय उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य**
> **कलाध्यापक संघ जिल्हा, शाखा पुणे**

# विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा वकिलांच्या वतीने निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : दिल्ली येथील जंतर-मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ नेवासा तालुक्यातील वकिलांच्या वतीने तहसीलदार नेवासा पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात येऊन निषेध व्यक्त करण्यात आला. आंदोलन करणे हा भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेला मूलभूत अधिकार असून,विद्यार्थ्यांवर बळाचा वापर न करता त्यांच्या न्याय्य मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांवरील कथित लाठी हल्ल्याची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करावी अशीही मागणी करण्यात आली.



निवेदनात म्हटले की, लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करण्याचा संविधानिक अधिकार आहे. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना किंवा त्यांना पाठिंबा देणाऱ्यांविषयी देशविरोधी अथवा दहशतवादाशी संबंधित बिनबुडाचे आरोप करणाऱ्यांवरही योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर केंद्र सरकारने संवेदनशीलतेने विचार करून तातडीने निर्णय घ्यावा आणि भविष्यात अशा शांततापूर्ण आंदोलनांवर बळाचा वापर होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी विधीज्ञ पांडुरंग औताडे, अँड.जैद शेख, अँड.एस.एस.गोर्डे, अँड. स्वप्निल गरड, अँड.मौर्य भारत भूषण, अँड.अर्जुन शेंडे, अँड.बाळासाहेब कावळे यांनी तहसीलदार तसेच पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर केले.

# शिर्डीत राज्य साखर कामगारांचे तीन दिवसीय कार्यकर्ता मार्गदर्शन शिबिर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**सोनई** : महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या वतीने राज्यातील साखर कामगारांसाठी तीन दिवसीय कार्यकर्ता मार्गदर्शन शिबिराचे आयोजन ३० जुलै ते १ ऑगस्टदरम्यान शिर्डी येथील साई पालखी निवारा येथे करण्यात आले आहे. या शिबिरात राज्यभरातील साखर कामगार संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांनी दिली.

३० जुलै रोजी सकाळी ११ वाजता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील राहणार आहेत. यावेळी माजी मंत्री जयंतराव पाटील, कलाप्पा आवाडे, आमदार मोनिका राजळे, आमदार आशुतोष काळे, पुरुषोत्तम जगताप, राजेंद्र नागवडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. १ ऑगस्ट रोजी शिबिरार्थी कामगारांचे मनोगत झाल्यानंतर समारोप सोहळा माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, शंकरराव गडाख, नरेंद्र घुले, गणपतराव पाटील, शिवाजीराव निंबाळकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# अजितदादांची विकासदृष्टी महाराष्ट्र सदैव स्मरणात ठेवेल : अशोकराव काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : दिवंगत उपमुख्यमंत्री तथा माजी अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आमदार अशोकराव काळे यांनी अजितदादांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या नेतृत्व, विकासदृष्टी आणि निर्णयक्षम कार्यशैलीचे स्मरण केले.



अशोकराव काळे म्हणाले, अजितदादांनी महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा दिली. विकासकामांना दिलेले प्राधान्य, सर्वसामान्य जनतेप्रती असलेली बांधिलकी आणि प्रशासनावरील भक्कम पकड यामुळे त्यांनी जनमानसात अढळ स्थान निर्माण केले. त्यांनी घालून दिलेला विकासाचा मार्ग पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

बारामती येथे झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात अजितदादांचे निधन झाल्याचे स्मरण करून काळे म्हणाले, त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना मन सुन्न होते. राजकारणाच्या पलीकडे जाऊन जिव्हाळ्याचे संबंध जपणारे नेतृत्व अचानक आपल्यातून निघून जाईल, अशी कल्पनाही केली नव्हती. विरोधी पक्षाचा आमदार असतानाही मतदारसंघातील विकासकामांसाठी त्यांनी भरघोस निधी उपलब्ध करून दिल्यामुळे अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागल्याचेही त्यांनी सांगितले. स्पष्टवक्तेपणा, वक्तशीरपणा, प्रशासनावरील मजबूत पकड आणि विकासाभिमुख निर्णयक्षमता हे अजितदादांच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक गुण असल्याचे नमूद करत, त्यांनी सांभाळलेल्या प्रत्येक पदाला त्यांनी न्याय दिल्याचे काळे म्हणाले. कार्यक्रमानिमित्त कारखाना परिसरात संचालकांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.यावेळी व्हा. चेअरमन प्रवीण शिंदे, संचालक राजेंद्र घुमरे, सूर्यभान कोळपे, दिलीपराव बोरनारे, श्रीराम राजेभोसले, सचिन चांदगुडे, शंकरराव चव्हाण, सुनील मांजरे, मनोज जगझाप, प्रशांत घुले, डॉ. मच्छिंद्र बर्डे, अशोकराव मवाळ, विष्णू शिंदे, श्रावण आसने, कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पावतीवर 'फ्री', तरी १२५ रुपयांची वसुली

## आधार सेवा केंद्रावर गैरप्रकार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** : शासनाकडून ५ वर्षांच्या मुलांच्या अनिवार्य आधार बायोमेट्रिक अपडेटसाठी मोफत सेवा उपलब्ध करून देण्यात आली असताना, श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील एका मोठ्या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या आवारात सुरू असलेल्या एका आधार सेवा केंद्रावर नागरिकांकडून १२५ रुपये घेतल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. विशेष म्हणजे संबंधित नागरिकाकडे असलेल्या आधार अपडेट पावतीवर स्पष्टपणे ''ऋशश : ० / ऋॲशश'' असा उल्लेख आहे. मात्र, त्याच वेळी केंद्रातील ऑपरेटरच्या नावावरून १२५ रुपयांचे ऑनलाइन पेमेंट करण्यात आल्याचा पुरावाही संबंधित नागरिकाकडे उपलब्ध आहे. पावतीवरील वेळ आणि ऑनलाइन व्यवहाराची वेळ एकच असल्याने या प्रकाराबाबत संशय अधिक गडद झाला आहे.




या घटनेमुळे शासनाच्या मोफत योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. ''पावतीवर मोफत सेवा दाखवून नागरिकांकडून पैसे घेतले जात असतील, तर हा प्रकार अत्यंत गंभीर आहे,'' अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. नागरिकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच अशा प्रकारे पैसे घेतले गेलेल्या इतर नागरिकांनीही पुढे येऊन तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान, संबंधित नागरिक यूआयडीएआय आणि जिल्हा प्रशासनाकडे उपलब्ध पुराव्यांसह तक्रार दाखल करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणात प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण श्रीरामपूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# अजितदादा पवार देशी गाय संशोधन केंद्राचे कार्य दिशादर्शक : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, पुणे येथील अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रात शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. देशी गोवंश संवर्धनाला आधुनिक संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि शाश्वत पशुपालनाची जोड देणाऱ्या या उपक्रमात शेतकरी, पशुपालक, संशोधक, कृषी विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी 'शाश्वत देशी गोपालन' या विषयावरील देशी गोवंश प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्याला अभिवादन करत, देशी गोवंश संवर्धनासाठी त्यांनी उभारलेले संशोधन केंद्र राज्यासाठी दिशादर्शक ठरत असल्याचे सांगितले. केंद्रात सध्या देशी गोवंशाच्या १३ जातींचे संगोपन सुरू असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संशोधनाची नवी दिशा विकसित होत असल्याचे त्यांनी नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणारे हे देशातील पहिले राज्य असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर संशोधनाधिष्ठित शेतीची गरज अधोरेखित करत शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढविण्यासाठी कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. महिला शेतकरी म्हणून स्वतंत्र प्रमाणपत्र देण्याचा शासनाचा निर्णय महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचा ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी ऑनलाईन संदेशाद्वारे देशी गोवंशाचे शाश्वत शेतीतील महत्त्व अधोरेखित करत, अजितदादा पवार यांच्या दूरदृष्टीतून उभारलेले हे संशोधन केंद्र देशातील सर्वोत्तम केंद्र व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, अजितदादा पवार यांच्या पुढाकारातून केंद्रासाठी ७२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून, त्याद्वारे जागतिक दर्जाचे संशोधन केंद्र उभारण्याचे उद्दिष्ट आहे. नैसर्गिक शेती, हवामान बदल आणि भारतीय सांस्कृतिक वारसा जतनासाठी देशी गोवंश संवर्धन अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी कृषी शिक्षण, संशोधन आणि प्रशासन यांच्यात अधिक समन्वयाची आवश्यकता व्यक्त केली. गुजरातमधील बन्सी गीर गौशाळेचे संस्थापक गोपालभाई सुतारिया यांनी देशी गायीच्या शेणावर आधारित जैविक उत्पादनांची माहिती देत महात्मा फुले कृषी विद्यापीठासोबत सामंजस्य करार करण्याची तयारी दर्शविली.

यावेळी 'शाश्वत देशी गोपालन' या मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले तसेच देशी गोवंशाचे जतन व संवर्धन करणाऱ्या गोपालकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, विद्यार्थी, शेतकरी, पशुपालक, कृषी सखी आणि बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सूर्यवंशी यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रशांत बोडके यांनी केले.

# महात्मा गांधी संकुलात विद्यार्थिनींना गणवेशाचे वितरण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : प्रवरानगर येथील महात्मा गांधी शैक्षणिक संकुलातील महात्मा गांधी कन्या विद्यालयात गुणवंत, गरीब व होतकरू विद्यार्थिनींना गणवेशाचे वितरण करण्यात आले.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका नलिनी जाधव यांनी केले. प्रवरानगर येथील प्रवीण सचदेव यांच्या सहकार्याने तसेच कन्या विभागातील शिक्षकांच्या पुढाकारातून शैक्षणिक गुणवत्तेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थिनींना गणवेशाचे वितरण करण्यात आले.

याचबरोबर संकुलाचे प्राचार्य विनायक मेथवडे यांनी विद्यार्थिनींना शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक बांधिलकी आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक मूल्ये यांविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्राचार्य विनायक मेथवडे, मुख्याध्यापिका नलिनी जाधव, उपमुख्याध्यापक दिलीप डहाळे, उपप्राचार्य संजय डुबे, पर्यवेक्षिका संगीता सांगळे, संजय ठाकरे, डॉ. शरद दुधाट, बाबासाहेब अंत्रे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माधुरी वडघुले, संगीता उगले, प्रफुल्ल नव्हाळे, विजयश्री कदम यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कमल थिटे यांनी केले, तर विलास गभाले यांनी आभार मानले.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# महायुतीच्या विकासाभिमुख धोरणातून विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार होईल : ना. राधाकृष्ण विखे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त प्रवरानगर येथील डॉ. धनंजयराव गाडगीळ सभागृहात आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' अभियानात जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी महायुती सरकारच्या विकासकामांचा आढावा घेत राज्याच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे सांगितले.




यावेळी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, सिंचन प्रकल्प, पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, महिला सक्षमीकरण आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून राज्यात सर्वांगीण विकास सुरू आहे. शेतकऱ्यांसाठी ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी आणि ४८ हजार कोटी रुपयांच्या वीजबिल माफीचा निर्णय घेऊन सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे काम केले आहे. प्रधानमंत्री पीकविमा योजना, किसान सन्मान निधी तसेच विविध कृषी योजनांमुळे शेतीला नवी दिशा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत सिंचन प्रकल्पांना गती देण्यात येत असून, गोदावरी नदीजोड प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष पाठबळ असल्याचे त्यांनी नमूद केले. साकळाई योजना, कुकडी प्रकल्प, गोदावरी कालव्याचे नूतनीकरण तसेच सौरऊर्जा प्रकल्पांमुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासाला मोठी चालना मिळत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शिर्डी विधानसभा मतदारसंघात पानंद रस्ते, गावनकाशे आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

स्व. अजितदादा पवार यांना आदरांजली वाहताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, विकासाभिमुख दृष्टिकोन असलेले नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. अनेक विषयांवर मतभेद झाले, तरी विकासाच्या कामांमध्ये त्यांनी कधीही कटुता येऊ दिली नाही. निळवंडे धरण प्रकल्पाचा पहिला महत्त्वाचा निर्णयही त्यांच्याच काळात झाला होता. जिल्ह्यातील विकासकामांसाठी त्यांनी नेहमी सकारात्मक भूमिका घेतली, अशा शब्दांत त्यांनी स्व. पवार यांच्या कार्याचा गौरव केला. माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी महायुती सरकारच्या माध्यमातून शेतकरी, कामगार आणि वंचित घटकांना न्याय देण्याचे काम होत असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा स्वरूपाची शिबिरे पुढेही आयोजित केली जाणार असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी केले. यावेळी महसूल, भूमी अभिलेख, कृषी, पशुसंवर्धन, ग्रामविकास, नगरविकास, आरोग्य, कौशल्य विकास, पुरवठा आणि एकात्मिक बालविकास विभागांच्या विविध योजनांतील लाभार्थ्यांना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात लाभांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे अधिकारी आणि लाभार्थी उपस्थित होते.

## द • ख • ल

### वृक्षारोपणातून अजितदादांची जयंती साजरी

**टाकळीभान :** महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री स्व. अजित दादा पवार यांच्या स्मृती कायम रहाव्या या भावनेतून वृक्षारोपण केल्याचे उद्गार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी किसान सभा उत्तर अ. नगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे यांनी काढले. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी किसान सभा व निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. उपमुख्यमंत्री अजित दादांच्या वाढदिवसानिमित्त टाकळीभान, महादेव मंदिर परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गावातील मान्यवर पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. त्याचप्रमाणे न्यू इंग्लिश स्कूल टाकळीभान या ठिकाणी ही उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन आले. शाळेच्या प्रांगणामध्ये मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

### उत्कृष्ट विमा व्यवसायाबद्दल विनायक गोऱ्हे यांचा सत्कार

**पुणतांबा :** इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (खझझइ) श्रीरामपूर शाखेतर्फे आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट विमा व्यवसाय केल्याबद्दल श्री विनायक गो-हे यांचा सत्कार करण्यात आला. गो-हे यांनी ३.४० लाखांच्या जीवन विमा पॉलिसींसह ४ लाखांहून अधिक रकमेच्या अपघाती व आरोग्य विमा पॉलिसींची नोंद करून उल्लेखनीय कामगिरी केली. शाखाप्रमुख काशीविश्वनाथ यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यकारी अधिकारी माधवी जोशी, आशीष गायकवाड, राहुल भिंगारदिवे, दिलीप भिंगारदिवे, वैभवी गलांडे तसेच शाखेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात जीवन, अपघाती व आरोग्य विम्याचे महत्त्व स्पष्ट करत इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या विविध विमा योजनांची माहिती देण्यात आली.

### मुकबधीर विद्यालयात आरोग्य साहित्य वाटप विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन



**नेवासा :** पाथर्डी येथील नवज्योत महिला सेवा संचलित निवासी मूकबधिर विद्यालयात पुणे येथील अजय कुलकर्णी व त्यांच्या बंधूंच्या वतीने मातोश्री कै. शालिनी अंबादास कुलकर्णी यांच्या १४ व्या स्मृती प्रित्यर्थ पाथर्डी शहरातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते आरोग्य साहित्याचे वाटप करून अन्नदान करण्यात आले. हा अभिनव उपक्रम गायक कलावंत अजय कुलकर्णी पुणेकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला. यावेळी पाथर्डी शहराचे नगराध्यक्ष अभय आव्हाड,उपनगराध्यक्ष मंगलाताई कोकाटे,नगरसेवक नंदकुमार शेळके,बजरंग बोडके डॉक्टर मृत्युंजय गर्जे,मूकबधिर विद्यालयाचे मार्गदर्शक नंदकुमार डाळींबकर,अजय भंडारी प्रतिक नांगरे,रमेश मोरगावकर, निवृत्त निवासी उपजिल्हाधिकारी किशोर राजगुरू प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.पुष्पांजली अर्पण करून आदर्श शिक्षिका स्वर्गीय शालिनी कुलकर्णी यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

### प्रवरेच्या २१ विद्यार्थ्यांची संशोधन प्रशिक्षणासाठी निवड

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्था अंतर्गत कार्यरत कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील २१ विद्यार्थ्यांची सातव्या सत्रातील सहामाही संशोधन प्रशिक्षणासाठी देशातील विविध नामांकित संशोधन संस्था आणि उद्योगांमध्ये निवड झाली आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक संशोधन तंत्रज्ञान, प्रयोगशाळेतील प्रत्यक्ष अनुभव आणि औद्योगिक कार्यपद्धतीचे ज्ञान मिळणार असल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या स्वरांजली गाढे यांनी दिली.

### सोनईत स्टॅम्पची चढ्या दराने विक्री; दुसरा विक्रेता नेमण्याची वकील संघाची मागणी

**सोनई :** सोनईसारख्या मोठ्या बाजारपेठेच्या शहरात गेल्या काही महिन्यांपासून स्टॅम्पची शासकीय दरापेक्षा अधिक किमतीने विक्री होत असल्याचा आरोप करत सोनई वकील संघाने प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. तसेच नागरिकांची गैरसोय व आर्थिक लूट थांबविण्यासाठी शहरात पर्यायी दुसरा स्टॅम्प विक्रेता नेमावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. वकील संघाच्या म्हणण्यानुसार, शंभर रुपयांच्या स्टॅम्पसाठी १४० रुपये, तर पाचशे रुपयांच्या स्टॅम्पसाठी ५५० रुपये आकारले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. यामुळे स्टॅम्प खरेदीदारांकडून दररोज मोठ्या प्रमाणात अतिरिक्त रक्कम वसूल केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय संबंधित ठिकाणी अधिकृत परवानगीशिवाय नोटरी नोंदणीसारखे कामही केले जात असल्याची तक्रार वकिलांनी केली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सोनई परिसरात स्टॅम्पची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होत असल्याने नागरिकांना पर्याय उपलब्ध व्हावा आणि शासकीय दराने स्टॅम्प मिळावेत, यासाठी तातडीने दुसरा मुद्रांक विक्रेता नियुक्त करण्याची मागणी वकील संघाने प्रशासनाकडे केली आहे.

## अजितदादांच्या स्मृतींना श्रीरामपुरात अभिवादन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त श्रीरामपूर येथील प्रशासकीय इमारतीत महसूल विभागाच्या वतीने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक यांनी अजितदादांच्या कार्याचा आदर्श तरुणांनी अंगीकारावा, असे आवाहन केले.

यावेळी बोलताना अनुराधाताई आदिक म्हणाल्या, आजचा दिवस वाढदिवसाचा असला तरी जयंती म्हणून साजरा करताना मन भरून येते. संकटात खंबीर आधार देणारे, कार्यकर्त्यांवर प्रेम करणारे आणि शिस्त, प्रामाणिकपणा व सेवाभाव जपणारे अजितदादा आजही प्रत्येकाच्या स्मरणात आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीचा आदर्श तरुणांनी स्वीकारणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. कार्यक्रमाला प्रांताधिकारी किरण पाटील, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, डॉ. रवींद्र जगधने, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राज्य सरचिटणीस अरुण पाटील-नाईक, विश्वनाथ आवटी, कैलास बोर्डे, सुनील थोरात, साजिद मिर्झा, प्रवीण काळे, निलेश भालेराव, अर्चनाताई पानसरे, मुख्तार शहा यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गंगाधर उगले ट्रस्टच्या साखर कामगार रुग्णालयाला वॉटर फिल्टर भेट देण्यात आले. तसेच विशेष मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेअंतर्गत अनुराधाताई आदिक यांनी मतदार पुनरिक्षणाचा अर्ज भरून जनजागृतीचा संदेश दिला. कार्यक्रमात उपस्थितांनी अजितदादांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण अभिवादन केले.

## त्रिमूर्ती महाविद्यालयात अजितदादा पवार यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**नेवासा :** नेवासा फाटा येथील शिक्षणमहर्षी स्वर्गीय साहेबराव घाडगे पाटील यांनी स्थापित केलेल्या त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे होते. त्यांनी आपल्या मनोगतात अजितदादा पवार यांच्या नेतृत्वगुणांचा गौरव करताना, त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाने, निर्णयक्षमतेने, वक्तशीरपणाने आणि विकासाभिमुख दृष्टीकोनातून महाराष्ट्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिल्याचे सांगितले.

## नगर-मनमाड मार्गावरील मृत्यू मालिकेची उच्च न्यायालयाकडून दखल



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** अहिल्यानगर-मनमाड राष्ट्रीय महामार्ग (क्र. १६०) वरील भीषण दुरवस्था, वाढते अपघात आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणाविरोधात दाखल जनहित याचिकेची मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने गंभीर दखल घेतली आहे. न्यायालयाने संबंधित कंत्राटदार कंपन्यांनाही प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्याचे आदेश देत सर्व संबंधितांना ७ ऑगस्टपर्यंत म्हणणे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. राहुरी तालुक्यातील तांभेरे येथील सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब पवार यांनी ड. शिवराज कडू पाटील यांच्या माध्यमातून जनहित याचिका दाखल केली आहे. यामध्ये राहुरी हद्दीतील महामार्गावरील मोठमोठे खड्डे, अपघातांची वाढती मालिका आणि प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. याचिकेनुसार, गेल्या दोन ते तीन वर्षांत या महामार्गावर ३० ते ४०

### कंत्राटदारांनाही प्रतिवादाची संधी

जणांचा मृत्यू झाला असून १०० हून अधिक नागरिक जखमी झाले आहेत. विशेषतः पावसामुळे रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाल्याने अपघातांचे प्रमाण वाढल्याचा दावा करण्यात आला आहे.

याचिकेत अपघातप्रवण ठिकाणी इशारा फलक उभारणे, ब्लॅक स्पॉटची माहिती प्रसिद्ध करणे, खड्डे तातडीने बुजविणे, रस्त्याचे रुंदीकरण, मृतांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देणे तसेच निष्काळजी कंत्राटदार व संबंधित जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात याचिकाकर्त्यांतर्फे ड. शिवराज कडू पाटील, शासनातर्फे ड. निखील टेकाडे आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे ड. विरेंद्र साकोळकर यांनी न्यायालयात बाजू मांडली.

## राहुरीत वंचितकडुन उद्या बंदची हाक

### पेपर फुटीतील आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पुकारलेल्या महाराष्ट्र बंद ला पाठिंबा देण्यासाठी राहुरीत वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली राहुरी शहर बंदचे आयोजन करण्यात आले आहे बंद संदर्भात तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले

निवेदनात म्हटले आहे की जंतर मंतर, नवी दिल्ली येथे पेपर फुटी परिक्षा प्रक्रियेतील गैरव्यवहार आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी झालेल्या अन्यायाविरोधात विद्यार्थी शांततापुर्ण आंदोलन करीत आहेत. या आंदोलनास सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी उपोषण करून पाठींबा दिला आहे. आंदोलनकर्त्यांना पोलीसांकडुन बळाचा वापर करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांवर लाठीमार, लाथा बुक्या आश्रधुर करण्यात आला व अनेक विद्यार्थी जखमी झाले या संपुर्ण घटनेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करुन हे कृत्य करणा-या पोलीस अधिकारी कर्मचारी यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी.

या प्रकरणातील नैतिक जबाबदारी स्वीकारुन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा अशी आमची ठाम मागणी आहे. तसेच जंतर-मंतर येथील विद्यार्थ्यांना अमानुषपणे पोलीसांनी मारहाण केली आहे. अनेक विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. म्हणुन विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्यांच्या समर्थन व पाठींबा देण्यासाठी दि. २४ जुलै रोजी राहुरी बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच दि. २३ जुलै रोजी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष श्रध्देय बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे.

परंतु दि. २३ जुलै रोजी राहुरी तालुक्याचा आठवडे बाजार आसल्यामुळे शेतकरी, कष्टकरी यांच्या शेतपिकांची व जनतेची गैरसोय होऊ नये म्हणून शुक्रवारी दि २४ जुलै रोजी बंदची हाक देण्यात आली आहे निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष संतोष चोळके तालुका अध्यक्ष बाळासाहेब जाधव जिल्हा संपर्कप्रमुख पिंटु साळवे, अमजद पठाण शिरीष गायकवाड नागेश जाधव ऋषिकेश साळवे गणेश पवार विवेक साळवे आदींचा सह्या आहेत


## जाहीर नोटीस

दिनांक – २२/०७/२०२६

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात श्री. नितीन मधुकर शिंदे, रा. सुपा, ता. पारनेर, जि. अहमदनगर यांनी आमचे अशिल पिरामल फायनान्स लि., शाखा अहिल्यानगर या वित्त संस्थेकडे खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकतीबाबत कर्ज प्रकरण केलेले आहे. त्या संदर्भात खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भात असणाऱ्या चेन डॉक्युमेंटस् पैकी अस्सल खरेदीखत दस्त क्र. १००७/२०१२, दिनांक ०९/०३/२०१२ जो दस्त सदर मिळकतीचे तेव्हाचे मालक १. क्षितीज लक्ष्मण नगरे २. सरला लक्ष्मण नगरे ३. लक्ष्मण नामदेव नगरे ४. आशिष लक्ष्मण नगरे नं २ ते ४ यांचे कु.मु म्हणून व स्वतःसाठी नं १ श्री. क्षितीज लक्ष्मण नगरे जे खरेदीखत देणार व श्री. महादेव शेषराव म्हेत्रे जे खरेदीखत घेणार यांचे दरम्यानचे मे. दुय्यम निबंधक साहेब पारनेर यांचे कार्यालयात नोंदविण्यात आलेले आहे ते अस्सल खरेदीखत त्याच्या अस्सल नोंदणी पावतीसह व इंडेक्ससह मागितले असता ते गहाळ झालेले आहे असे सदर कर्ज घेणार श्री. नितीन मधुकर शिंदे यांनी आमच्या अशिलास सांगितलेले आहे व त्यासंदर्भात सदर मिळकतीचे विद्यमान मालक फरजाना सलमान खान यांची पारनेर पोलिस स्टेशनमध्ये योग्य ती ऑनलाईन दस्त गहाळ तक्रार गहाळ रजि. नं AwSEL1cKrE दिनांक २२/०७/२०२६ अन्वये दिलेली आहे. तरी सदर अस्सल खरेदीखत लेख त्याच्या अस्सल नोंदणी पावती व इंडेक्स बाबत तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, टायगर कॅपिटल लि. या बोजा व्यतिरिक्त कोणचेही कोणतेही खरेदीखत, साठेखत, विसार, गहाण, दान, बक्षीसपत्र, कर्ज, बोजा, लीज, लीन, वारसाहक्क, मुखत्यारपत्र, इच्छापत्र, कोर्ट मनाई हुकूम, अव्वल जप्ती, कोर्ट कार्यवाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, इजमेन्टरी राईटस्, पोटगी, खाजगी अथवा सार्वजनिक बँका, वित्तसंस्था, पतसंस्था यांची काही तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर समक्ष आणून द्यावी व त्याची रितसर पोहोच घ्यावी अथवा रजिस्टर पोस्टाने कळवावे. मुदतीत कोणचीही कोणतीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकती संदर्भात कोणचीही कोणतीही तक्रार नाही व असल्यास त्याने ती जाणीवपूर्वक सोडून दिलेली आहे असे समजून सदर कर्ज प्रकरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

**परिशिष्ट – डि.।। अहमदनगर सब. डि।। पारनेर पैकी मौजे सुपा येथील गट नं ३५ प्लॉट नं १ याचे एकूण क्षेत्रफळ १४१.७५ चौ.मी ही संपूर्ण मिळकत यांसी चतुःसिमा सरकारी रेकॉर्डप्रमाणे व खरेदीखताप्रमाणे**– येणेप्रमाणे मिळकत वागणुकीच्या वहिवाटीच्या हक्कासह काही एक राखून न ठेविता.

**दिनांक :– २२/०७/२०२६**

शिक्का

**सही/–**
**ॲड. गिरीष दयानंद लेले**
फ्लॅट नं ४ युवराज रेसीडेन्सी, गजराज फॅक्टरी जवळ, भिस्तबाग, सावेडी, अहिल्यानगर


## ग्रोमोर प्रकरणी पोलिसांनी स्विकारलेली दिड कोटीची लाच परत करा : डॉ. पिपाडा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी :** भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी राज्याचे पोलिस महासंचालकांची मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेऊन शिर्डी येथील ग्रो-मोअर फायनान्स घोटाळ्यात शेतकरी कामगार कष्टकरी यांची आर्थिक फसवणूक प्रकरणातील एक वर्षापासुन फरार आरोपींना अटक करुन त्यांची संपत्ती जप्त करावी. याशिवाय, पोलिसांनी मुख्य आरोपीकडुन दीड कोटी रु. घेतल्याने एसपींनी चौघांना दि.२१ जुलै २०२५ रोजी निलंबित केले असून ते दीड कोटी रुपये ठेवीदारांना देण्यासाठी पोलिसांकडुन हस्तगत करुन त्यांना बडतर्फ करावे अशीही मागणी निवेदनात केली आहे. यावेळी कन्या ट्विंकल पिपाडा या उपस्थित होत्या.

डॉ. पिपाडा यांनी दिलेल्या निवेदनात ग्रो-मोअर फायनान्स कंपनीने शेतकरी, कामगार, कष्टकरी, लहान व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिकांना गुंतवणुकीवर दुप्पट परताव्याचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेकांनी शेती विकून, कर्ज काढून किंवा व्याजाने पैसे उभे करून गुंतवणूक केली असून फसवणुकीमुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रकरणातील भाऊसाहेब थोरात, राजाराम साळवे, अरुण नंदन व पूजा गोकुळ पोटींडे यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल होऊनही त्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच या प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेबाबतही चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी डॉ. पिपाडा यांनी शिर्डीतील खून, साखळी चोरी, कामगारांवरील हल्ले आणि भाविकांच्या सुरक्षेचे प्रश्न उपस्थित करत वाढत्या गुन्हेगारीमुळे शिर्डीची प्रतिमा मलिन होत असल्याची चिंता व्यक्त केली. साईनगरीचे पावित्र्य अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारांवर कठोर कारवाई करून कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी विशेष लक्ष घालावे, अशी मागणी त्यांनी पोलिस महासंचालकांकडे केली.


## सायटेशन नोटीस

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**

**प्रो.फी. जमा.रु.**
**पान.न. दि. / / २०२६**
**चौ.अ. नं. २७०/२०२६**

अर्जदार
श्री. भाऊसाहेब आण्णा मोटकर रा. घोटण
सामनेवाला
सरकार

सदर अर्जदार हा मौजे घोटण येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार श्री. भाऊसाहेब आण्णा मोटकर रा. घोटण ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर यांची आई सुलोचना आण्णा मोटकर यांचा मृत्यू दि.०२.११.२०२३ रोजी मौजे घोटण, ता. शेवगाव जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्म/मृत्यू चा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म / मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहून गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या आईची नोंदणी प्रमाणपत्र (मृत्यू दिनांक २.११.२०२३ नोंदणी दाखला) मिळू शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांना जन्म/मृत्यू नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रापचांयत कार्यालय यांच्या जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने नगरपरिषद / ग्रामपंचायत कार्यालय येथे जावुन जन्म / मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म/मृत्यू ची नोंद नसलेबाबत दि. २८.१०.२०२४ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे. जन्म/मृत्युच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवू शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या आईची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या दृष्टीने जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहु जन्म/मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन पंधरा दिवसाचे आत दि. १२/७/२०२६ पूर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. १२/०६/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

**हुकमावरुन**

शिक्का

**सही/–**
**तहसिलदार शेवगाव**

## पान १ वरुन

# कर्जमाफीची पहिली यादी केवळ ५३३ शेतकऱ्यांची!

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांसाठी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवशी आणि अजित पवार यांच्या जयंतीदिनी पहिली यादी जाहीर करण्याचा सरकारचा मानस होता. मात्र, प्राप्तिकर विभागाकडून माहिती न मिळाल्याने मर्यादित यादी प्रसिद्ध करण्यात आली असे यावेळी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.या योजनेसाठी ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, १२ राष्ट्रीयीकृत बँका आणि इतर खासगी बँकांसह एकूण ५३ बँकांनी महाआयटीच्या पोर्टलवर कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. सहकार विभागाने त्याची पडताळणी करून पात्र लाभार्थ्यांची यादी तयार केली असून पहिल्या टप्प्यातील ५३३ लाभार्थ्यांना मोबाईलवर आधार प्रमाणीकरणासाठी संदेश पाठविण्यात येणार आहे. आधार प्रमाणीकरण आणि ग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण झाल्यानंतर कर्जमाफीची रक्कम थेट कर्जखात्यात जमा केली जाईल.आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर आणि नाबार्डची आवश्यक परवानगी मिळाल्यानंतर बँकांना कर्जवाटपाच्या सूचना दिल्या जातील. राज्यातील सुमारे ३२ हजार 'आपले सरकार' सेवा केंद्रांवर आधार प्रमाणीकरणाची सुविधा उपलब्ध करण्यात आली असल्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी सांगितले. ३१ जुलैपर्यंत सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतील पात्र लाभार्थ्यांची प्रक्रिया पूर्ण करून त्यानंतर राष्ट्रीयीकृत आणि इतर व्यापारी बँकांतील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात येईल, असा दावा सहकार विभागाने केला आहे.

## धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा, पंतप्रधानांची माफी हवी... राहुल गांधी यांची मागणी

असून सुमारे ७.५ कोटी विद्यार्थी व त्यांच्या कुटुंबांवर त्याचा परिणाम झाला आहे. एवढ्या मोठ्या गैरप्रकारानंतरही एकाही दोषीला शिक्षा झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांऐवजी लाखो रुपये मोजणाऱ्यांना संधी मिळत असल्याची टीकाही त्यांनी केली.शिक्षणावरील खर्चाचा उल्लेख करत राहुल गांधी म्हणाले की, केंद्र सरकारचे शिक्षण अंदाजपत्रक सुमारे १.४ लाख कोटी रुपये असताना, नीट परीक्षेसाठी विद्यार्थी व पालकांचा खर्च जवळपास १.३२ लाख कोटी रुपये इतका असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे शिक्षण व्यवस्था मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांच्या आवाक्याबाहेर गेल्याचे त्यांनी म्हटले.दरम्यान, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राहुल गांधी आणि काँग्रेसवर पलटवार करत, विद्यार्थ्यांचा वापर राजकीय हेतूसाठी केला जात असल्याचा आरोप केला. सरकार चर्चा करण्यास तयार असतानाही काँग्रेसने राजकीय संघर्षाचा मार्ग स्वीकारल्याचा दावा त्यांनी समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये केला.'चलो संसद' मोर्चानंतर दिल्ली पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे आंदोलन अधिक तीव्र झाले असून देशभरात विद्यार्थ्यांकडून निषेध व्यक्त केला जात आहे. विरोधी पक्षांचे नेतेही आंदोलनाच्या समर्थनार्थ मैदानात उतरले आहेत.

## सहा फुटीर खासदारांना सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

हेच नाही तर या नोटीसला दोन आठवड्यांच्या आत उत्तर देण्याचे आदेश आहेत.६ खासदारांसाठीच नाही तर एकनाथ शिंदे यांच्याही अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. आता या ६ खासदारांकडून नक्की काय उत्तरे दिली जातात, हे पाहण्यासारखे ठरणार आहे. यापूर्वी या खासदारांना पक्षाकडूनही नोटीस देण्यात आली होती. या नोटीसला ७ दिवसांमध्ये उत्तर देण्यास सांगितले होते. आता कोर्टाने नोटीस पाठवली.यापूर्वी खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई यांच्याकडून ६ खासदारांना नोटीस पाठवण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा सुप्रीम कोर्टाकडून नोटीस पाठवण्यात आली. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला काही मंत्रीपद मिळण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावरही होते. मात्र, केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारापूर्वीच फुटीर खासदारांच्या अडचणीत वाढ झाली. यापूर्वी खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई यांच्याकडून ६ खासदारांना नोटीस पाठवण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा सुप्रीम कोर्टाकडून नोटीस पाठवण्यात आली. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला काही मंत्रीपद मिळण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावरही होते. मात्र, केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारापूर्वीच फुटीर खासदारांच्या अडचणीत वाढ झाली.

## मढीत साधू महिलेसह नग्नावस्थेत!

परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे.या प्रकरणात संबंधित महिला स्वतःच्या इच्छेने तेथे गेली होती की तिला जबरदस्तीने नेण्यात आले होते, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. तसेच वृत्त लिहिपर्यंत या संदर्भात पाथर्डी पोलीस ठाण्यात कोणताही गुन्हा दाखल झालेला नव्हता.घटनेनंतर सरपंच संजय मरकड यांनी देवस्थान ट्रस्टच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. संबंधित साधू तसेच या प्रकरणातील जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.श्रद्धास्थान मानल्या जाणाऱ्या मंदिर परिसरात घडलेल्या या कथित प्रकारामुळे भाविकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, पोलिसांच्या अधिकृत तपासानंतरच संपूर्ण घटनेचे सत्य समोर येणार आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे जिल्हाभराचे लक्ष लागले आहे.वाढ झाली. हेच नाही तर या नोटीसला दोन आठवड्यांच्या आत उत्तर देण्याचे आदेश आहेत. ६ खासदारांसाठीच नाही तर एकनाथ शिंदे यांच्याही अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. आता या ६ खासदारांकडून नक्की काय उत्तरे दिली जातात, हे पाहण्यासारखे ठरणार आहे. यापूर्वी या खासदारांना पक्षाकडूनही नोटीस देण्यात आली होती. या नोटीसला ७ दिवसांमध्ये उत्तर देण्यास सांगितले होते. आता कोर्टाने नोटीस पाठवली.यापूर्वी खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई यांच्याकडून ६ खासदारांना नोटीस पाठवण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा सुप्रीम कोर्टाकडून नोटीस पाठवण्यात आली. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला काही मंत्रीपद मिळण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावरही होते. मात्र, केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारापूर्वीच फुटीर खासदारांच्या अडचणीत वाढ झाली. यापूर्वी खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई यांच्याकडून ६ खासदारांना नोटीस पाठवण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा सुप्रीम कोर्टाकडून नोटीस पाठवण्यात आली. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला काही मंत्रीपद मिळण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावरही होते. मात्र, केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारापूर्वीच फुटीर खासदारांच्या अडचणीत वाढ झाली.

### सोनम वांगचुक यांची उपोषण सोडण्याची तयारी

अण्णा हजारे यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून विद्यार्थी आंदोलनाकडे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून नव्हे, तर जनभावनेचा विषय म्हणून पाहण्याचे आवाहन केले आहे. लोकशाहीत दडपशाहीऐवजी संवादातून प्रश्न सोडवावेत, पेपरफुटी, बेरोजगारी आणि भरती प्रक्रियेतील विलंब यांसारख्या मुद्द्यांवर सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, तसेच महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या मार्गाने लोकशाही मूल्यांचे जतन करावे, असे अण्णा हजारे यांनी पत्रात नमूद केले आहे. सरकार आणि आंदोलनकर्त्यांमध्ये सुरू झालेल्या चर्चेतून तोडगा निघतो की आंदोलन अधिक तीव्र होते, याकडे आता देशभराचे लक्ष लागले आहे.

# एसआयआर अभियानाला गती द्या

## बूथ प्रमुखांनी बीएलओंना सहकार्य करावे : आ. प्रशांत बंब

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (एसआयआर) अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मतदार नोंदणी व पडताळणी प्रक्रियेला गती देण्याचे आवाहन आमदार प्रशांत बंब यांनी केले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित विविध सामाजिक व विकासात्मक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर वाळूज येथे झालेल्या एसआयआर आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी मतदार यादीच्या विशेष पुनर्निरीक्षण अभियानाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बीएलओंना (बूथ लेव्हल ऑफिसर्स) भाजपच्या बूथ प्रमुखांनी आवश्यक ते सहकार्य करून मतदार नोंदणी, पडताळणी व पुनर्निरीक्षणाची कामे वेळेत



आणि अचूक पूर्ण करण्यासाठी समन्वयाने कार्य करण्याच्या सूचना आमदार बंब यांनी दिल्या.

बैठकीस तहसीलदार नवनाथ वगवाड, नायब तहसीलदार मयुरा पेरे, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक शेषराव जाधव, नंदकुमार गांधीले, अमोल जाधव, भाजप तालुकाध्यक्ष रवी चव्हाण, संतोष जाधव यांच्यासह बूथ प्रमुख व पदाधिकारी उपस्थित होते.

यानंतर गंगापूर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. एस. बी. स्कूलमधील अबॅकस स्पर्धेत मराठवाड्यात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. वजनापूर फाटा येथे कर्जमाफीबाबत आयोजित शेतकरी कार्यक्रमाला भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला.

सुलतानाबाद येथे वृक्षारोपण, लासूर स्टेशन येथे रक्तदान शिबिर, 'स्वर्ग स्थळ'चे लोकार्पण तसेच शासकीय योजनांच्या मंजुरीपत्रांचे वितरण करण्यात आले. खुलताबाद ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप केल्यानंतर म्हैसमाळ रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. विविध उपक्रमांमधून मतदार जनजागृती, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, आरोग्य सेवा आणि विकासकामांना चालना देण्याचा संदेश देण्यात आल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त गंगापूरात रक्तदान, वृक्षारोपण व रुग्णसेवा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये भव्य रक्तदान शिबिर, वृक्षारोपण तसेच रुग्णांना फळवाटप करण्यात आले. रक्तदान शिबिरात युवक व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली, तर रुग्णालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.यावेळी आरबीएसके (राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम) अंतर्गत कार्यरत डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी आमदार प्रशांत बंब यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य विभागासाठी घेतलेल्या निर्णयांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच आरोग्य क्षेत्रातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी आमदार बंब यांनी केलेल्या पाठपुराव्याबद्दल त्यांचे आभार मानले.या कार्यक्रमास मुख्याधिकारी संतोष आगळे, लोकप्रतिनिधी, वैद्यकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून रक्तदान, पर्यावरण संवर्धन आणि रुग्णसेवेचा सामाजिक संदेश देण्यात आला.



## भारनियमनाविरोधात शेतकरी संघटनेचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** मुळा-प्रवरा कार्यक्षेत्रात महावितरणकडून गेल्या चार महिन्यांपासून सुरू असलेल्या बेकायदेशीर भारनियमनामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. याविरोधात शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे व तालुकाध्यक्ष युवराज जगताप यांच्या नेतृत्वाखाली कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांना शेतीसाठी सुरळीत वीज पुरवठा न झाल्यास दि.२८ जुलै २०२६ रोजी महावितरणच्या कार्यालयावर हजारो शेतकऱ्यांचा मोर्चा काढून कार्यालय बंद पाडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. मुख्य अधीक्षक अभियंत्यांशी फोनवर चर्चा झाल्यानंतर शेतीसाठी ८ तास थ्री फेज व सिंगल फेज वीज पुरवठा तात्काळ देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.यावेळी अनिल औताडे, युवराज जगताप, सतीश नाईक, संतोष भालदंड, बाळासाहेब जाधव यांच्यासह अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.

## सेस फंडातून कडबाकुट्टी, स्लरी फिल्टर व कृषी ड्रोनसाठी अर्ज मागविले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या कृषी विभागामार्फत सेस फंड २०२६-२७ अंतर्गत विविध कृषी योजनांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून, पात्र शेतकरी, नोंदणीकृत शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून शेतकऱ्यांचे कष्ट कमी करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत असल्याची माहिती नेवासा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय लखवाल यांनी दिली. या योजनेत जनावरांच्या चाऱ्याचे नियोजन व नासाडी टाळण्यासाठी कडबाकुट्टी मशीन, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी स्लरी फिल्टर, तसेच नोंदणीकृत शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी कृषी ड्रोन उपलब्ध करून दिले जाणार आहेत. योजनेसाठी २१ जुलै ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. त्यानंतर १ ते ५ सप्टेंबर दरम्यान पंचायत समिती स्तरावर संगणकीय अथवा प्रत्यक्ष लॉटरीद्वारे लाभार्थ्यांची पारदर्शक निवड करण्यात येईल. संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरणही केले जाणार असल्याची माहिती कृषी विस्तार अधिकारी बाळासाहेब कासार यांनी दिली. निवड झालेल्या लाभार्थ्यांना ६ सप्टेंबरपासून पूर्वसंमती पत्र देण्यात येणार असून, जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र शेतकरी, नोंदणीकृत गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी मुदतीत संबंधित पंचायत समितीकडे अर्ज सादर करून या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे यांनी केले आहे.

## ज्ञानोदय इंग्लिश स्कूल व सुंदरबाई कन्या विद्यालयात गरजू विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित नेवासा येथील ज्ञानोदय इंग्लिश स्कूल व कै.सौ. सुंदरबाई हिरालाल गांधी कन्या विद्यालयात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना नेवासा येथील श्री मोहिनीराज देवस्थान ट्रस्ट नेवासा यांच्या वतीने बुधवार दि.२२ जुलै २०२६ रोजी विश्वस्त श्री. जयेश



बडवे व विश्वस्त श्री. अनंत बडवे यांच्या हस्ते शालेय गणवेशाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य रावसाहेब चौधरी,पर्यवेक्षक सुनील धस,पर्यवेक्षक अरुण चौधरी,माजी प्राचार्य पंडितराव खाटीक,ज्ञानोदयचे सेवानिवृत्त ज्येष्ठ अध्यापक आसाराम नळघे,रावसाहेब बऱ्हाटे,शिक्षक सुधीर बोरकर, काकासाहेब काळे, अनिल भणगे, भाऊसाहेब चाबुकस्वार, महेश लोखंडे, राजेंद्र चारूडे उपस्थित होते.

## सौंदाळा येथे पाणंद रस्त्यासाठी शेतकऱ्यांचा 'रस्तारोको' तहसीलदारांचे आश्वासनानंतर आंदोलन मागे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील सौंदाळा येथील गावठाण ते भेंडा- वडाळा रस्त्यालगत असलेला सुमारे दीड किलोमीटर लांबीचा पानंद रस्ता अतिक्रमण मुक्त करून शेकडो शेतकऱ्यांसाठी खुला करा या मागणीसाठी बुधवार दि.२२ जुलै रोजी सौंदाळा येथील शेतकऱ्यांनी भर पावसात नेवासा-शेवगाव राज्यमार्गावर रस्तारोको आंदोलन केले. सौंदाळा गावठाण ते भेंडा-वडाळा रस्त्यालगत असलेल्या शेकडो शेतकऱ्यांनी आज पानंद रस्त्यावरील सर्व अतिक्रमण तात्काळ हटवून रस्ता कायमस्वरूपी खुला



करा, रस्त्याचे अधिकृत सीमांकन करून दगडी खांब बसवा, अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा, रस्त्याचे समतलीकरण व मुरमीकरण करून वाहतुकीसाठी योग्य करा, कार्यवाहीची लेखी कालमर्यादा द्या या मागण्यासाठी रास्तरोको आंदोलन केले. दरम्यान, आंदोलकांचे निवेदन मंडलाधिकारी सरिता मुंडे यांनी स्वीकारले. मुंडे यांनी तहसीलदार व आंदोलकांचे बोलणी करून दिल्यावर आंदोलकांना तहसीलदारांनी याबाबत तातडीने पोलीस बंदोबस्त देऊन रस्ता खुला करण्याचे आश्वसन दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले. यावेळी सरपंच शरदराव आरगडे, बाळासाहेब बोधक, वसंत बोधक, दिलीप बोधक, संकेत बोधक, किशोर बोधक, प्रदिप आरगडे, भाऊसाहेब आरगडे. शोभा बोधक, संगीता बोधक, अनुसया आरगडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME MOHAMMAD HUSSAIN MOHAMMAD SHAIKH (NAME ASPER OLD PASSPORT NO.F3436736) TO NEW NAME AS MOHAMMAD HUSSAIN MAMMU SHAIKH VIDE AADHAR NO.2457 5105 5363

## दिल्लीत विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ वैजापूर काँग्रेसचा निषेध मोर्चा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** दिल्ली येथील जंतर-मंतरवर नीट परीक्षा व पेपरफुटी प्रकरणी न्याय मागण्यासाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस लाठीमाराचा तसेच आंदोलनादरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी, खा. प्रियंका गांधी व इतर काँग्रेस नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याच्या घटनेच्या निषेधार्थ आज वैजापूर तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे निदर्शने करण्यात आली.

यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत पायी निषेध मोर्चा काढण्यात आला. मोर्च्यानंतर उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन विद्यार्थ्यांवरील कारवाईचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला तसेच विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी तालुका काँग्रेस अध्यक्ष राहुल संत, सुनील बोडखे, बाबासाहेब गायकवाड , मधुकर साळुंखे सागर थोट,रोहित आहेर शाक्यसिंह त्रिभुवन, अक्षय रोठे बाबासाहेब गायकवाड, साहेबराव पडवळ, राजू शेख, प्रवीण खाजेकर, सुनील बोडखे, कैफ शेख, सागर थोट, फैय्याज सय्यद, विशाल त्रिभुवन, सतीश धुळे ,सचिन रोठे, गौरव मिसाळ, तेजस डिके तसेच काँग्रेस व युवक काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी काँग्रेस पक्ष कायम त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील, लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा प्रत्येक नागरिकाचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळालाच पाहिजे, अशी भूमिका उपस्थितांनी व्यक्त केली.

### निधन वार्ता

## ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ शरदराव माणकेश्वर



**अहिल्यानगर** शहरातील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, निवृत्त प्राचार्य तथा अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या विविध शैक्षणिक संस्थांमध्ये दीर्घकाळ सेवा बजावलेले शरदराव दत्तात्रय माणकेश्वर (वय ८७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सुन, जावई, नातवंडे, पंतू असा मोठा परिवार आहे.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME FARJANA MOHAMMAD HUSSAIN SHAIKH (SPOUSE NAME ASPER HUSBAND PASSPORT O.F3436736) TO NEW NAME AS FARZANA MOHAMMAD HUSAIN SHAIKH VIDE AADHAR NO.2375 8833 0421

**CHANGE OF NAME**

I BHAYYA ABBASBHAI PATHAN S/O- ABBASBHAI PATHAN, R/O- CHINCHVIHIRE, TAL-RAHURI, DIST-AHMEDNAGAR 413706, Here By Declares That BHAIYYSAHEB ABBASBHAI PATHAN Are Both Same And One Identical Person Vide Affidavit No. 2652242101268100648020 Dated: 21.07.2026 And Shall Be Known BHAYYA ABBASBHAI PATHAN For All The Future Purposes.

## १५ दिवसांच्या जमावबंदीचे कारण काय?

करणाऱ्या विद्यार्थ्यांची भेट घेतली व त्यांचं मनोबल उंचावलं. या ठिकाणी बोलताना उद्धव ठाकरे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांच्या संघर्षाला नमन करतच, फक्त आता धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा नको, तर या सरकारलाच घालवायला हवं, अशी भावना व्यक्त केली. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी आज (२२ जुलै) भेटीगाठी करताना आंदोलनाला योग्य दिशेनं नेण्यासाठी चर्चा केली. आज सकाळी त्यांनी पहिल्यांदा पत्रकार परिषद घेतल्यानंतर आम आदमी पक्षाचे समन्वयक अरविंद केजरीवाल यांची भेट घेत विविध मुद्द्यांवर चर्चा केली. अरविंद केजरीवाल यांच्याशी चर्चा केल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी सुद्धा आंदोलनासंदर्भात चर्चा केली. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी, केंद्रीय मंत्र्यांचा राजीनामा सरकारकडून गांभीर्याने घेतला जात नसल्याने वेगळ्या रणनीतीची गरज निर्माण झाली आहे. असे मत व्यक्त केले. दुसरीकडे, राहुल गांधी यांच्याशी चर्चा झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी चर्चा केली. त्यामुळे काँग्रेस आणि ठाकरे गट मुंबईमध्ये आंदोलन करण्यासाठी तयारी करत असल्याचं चित्र आहे. त्यामुळे दिल्लीमध्ये जंतर-मंतरवर ज्या पद्धतीने मोठं आंदोलन उभं राहिलं आहे, दिल्ली पोलिसांनी केलेल्या अत्याचारानंतरही विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा एकजुट दाखवत जंतर-मंतरवरती तळ ठोकला आहे त्या पद्धतीने आंदोलन उभं राहणार का? याकडे लक्ष असेल.

## पिकअप व दुचाकीचा समोरासमोर अपघात; तरूण ठार

दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला.या अपघातात नितीन भाऊसाहेब काळे ( अंदाजे, वय २८, त्रिंबकपूर ता. राहुरी) असे मुत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहेत. पिकअपच्या जोराने धडकेमुळे रस्त्यावर तरूण रक्ताच्या थारोळ्यात पडलेला असता, त्या तरूणाचा जागीच मुत्यू झाला.या अपघाताची माहिती मिळताच लोणी पोलीस स्टेशनचे हवालदार साईनाथ राशिनकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी प्रवरा ग्रामीण रुग्णालय येथे पाठविण्यात आला आहे.या घटनेमुळे ममदापूर परिसरात शोककळा पसरली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लोणी पोलीस करीत आहेत. सदरचे सध्या अपघातग्रस्त दोन्ही वाहने घटनास्थळी तेथे पडून होते.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

गुरुवार दि .२३ जुलै २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

१३९ ४९० ६७० — ३-१ — १४६ २९० ४७०

जोड ३९-७१-२५-६८-१०

**कल्याण**

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

१२४ ४६७ १३३ — ७-५ — १४० १५९ ११३

जोड ७९-३५-८१-२४-५०

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

१५८ ३५७ ११३ — ५-३ — १२० ६७० ५८०

जोड ५७-८३-६२-९०-३४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 6 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 8 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 8 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 2 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 9 | | | | |

## द • ख • ल

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शेवगावात रक्तदान शिबिर



**शेवगाव :** भारतीय जनता पार्टी, शेवगाव तालुक्याच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त आमदार कार्यालय, शेवगाव येथे 'सेवा यज्ञ – महारक्तदान संकल्प' या सामाजिक उपक्रमांतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला युवकांसह नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी वाढदिवसानिमित्त जाहिराती, बॅनरबाजी व अनावश्यक खर्च टाळून सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या प्रेरणादायी संदेशाला प्रतिसाद देत शेवगाव तालुका भाजपच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी बापूसाहेब पाटेकर, सचिन वायकर, भीमराज सागडे, नगरसेवक डॉ. नीरज लांडे, गणेश कोरडे, खंडेराव बुलबुले, गणेशराव रांधवणे, अनिल सुपेकर, सुधीर जायभाय, सोमनाथ वीर, सोमनाथ कळमकर, सुरेश बडे, अजय भारस्कर, सतीश लांडे, राहुल मालुसरे, राहुल सावंत, सौरव मुरदारे, अनंता उकिरडे, महादेव पाटेकर, रोहन फडके, अभी कबाडी, गणेश रणखांब, नारायण मडके, महादेव सातपुते, सुभाष बडदे, महादेव पवार, अभी अंधारे, यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

### अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त पुतळा सुशोभीकरणाची मागणी



**अहिल्यानगर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त सिद्धार्थनगर येथील त्यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण व परिसराची स्वच्छता करण्यात यावी, या मागणीसाठी सकल मातंग समाज, अहिल्यानगरच्या वतीने महापालिका आयुक्त, महापौर तसेच अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सिद्धार्थनगर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पॉलिश करून स्मारकाची रंगरंगोटी करण्यात यावी. तसेच फुलांची आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई, मंडप, स्टेज व ध्वनीक्षेपकाची व्यवस्था करण्यात यावी. जयंती सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुतळा परिसर व आजूबाजूचा परिसर महापालिकेच्या माध्यमातून स्वच्छ करून आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी सकल मातंग समाजाचे अंकुश मोहिते, पप्पू पाटील, याकोब वडागळे, येसुदास वाघमारे, प्रल्हाद भालेराव, अनिल वाघमारे, तेजस साठे, संकेत पवार, सिद्धांत ससाणे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्व. अजित पवार यांची जयंती साजरी



**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवार रोजी स्वर्गीय नामदार अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षक बापूसाहेब लोढे, माजी सरपंच डॉ. अरुण पवार तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन यांनी स्वर्गीय अजितदादा यांच्या कार्याचा गौरव करत आपल्या आठवणींना उजाळा दिला. अध्यक्षीय समारोपात सूर्यकांत पाऊलबुद्धे यांनी स्वर्गीय अजितदादा आणि घुले पाटील कुटुंब यांच्यातील जिव्हाळ्याच्या संबंधांचा उल्लेख केला. तसेच मा. आ. नरेंद्रजी घुले पाटील व मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील आमदार असताना तालुक्यात राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक व विकासकामांमध्ये स्वर्गीय अजितदादांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास जयराम नांगरे, मच्छिंद्र पानकर, सुभाष पवार, जयराम निळ, विकास कसबे, शिक्षक-शिक्षिका, कर्मचारीवृंद तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मकरंद बारगुजे यांनी केले, तर आभार प्रदर्शन बाबासाहेब मोहिते यांनी मानले.

# स्व. अजित पवार जयंतीनिमित्त 'लाडक्या बहिणीं'ना साड्यांची भेट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त बुरुडगाव येथे सामाजिक बांधिलकी जपत महिलांसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते संकेत कुलट आणि नवनाथ वाघ यांच्या पुढाकारातून तसेच आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील 'लाडक्या बहिणीं'ना नवीन सहावारी व नऊवारी साड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात एक हजारांहून अधिक महिलांना साड्यांचे वितरण करण्यात आले असून, महिलांचा या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी त्यांच्या कार्याला उजाळा देत आदरांजली वाहिली. यावेळी अजित पवार अमर रहे अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. महिलांनीही मोठ्या उत्साहाने कार्यक्रमात सहभाग नोंदवित उपक्रमाचे स्वागत केले.

यानंतर गावातील महिलांना नवीन सहावारी आणि नऊवारी साड्यांचे वितरण करण्यात आले. साडी स्वीकारताना अनेक महिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसून येत होता. सामाजिक बांधिलकी जपत महिलांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

याप्रसंगी सोनाली कुलट, स्नेहल कुलट, मनिषा कुलट, मंगल वाघ, सुभाष कुलट, मुन्ना कुलट, विशाल पवार, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे, मुख्याध्यापक मंगेश झिने, भाजप अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अकिलभाई



इनामदार, दिलीप बोठे, राधाकिसन कुलट, जालिंदर कुलट, खंडू काळे, बाळासाहेब जाधव, दिनेश शेळके, रवींद्र डमढेरे, अमित जाधव, दिलीप पाचारणे, गणेश दरंदले, भैय्या शिंदे, भैय्या साळुंके, संदीप पाचारणे, सोहेल सय्यद, जब्बार शेख, अविनाश कुलट, राजू शेख, गहिनीनाथ वाघ यांच्यासह गावातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संकेत कुलट म्हणाले की, स्व. अजित पवार यांनी आपल्या कार्यकाळात ग्रामीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले. रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा दिली. त्यांचा आ. संग्राम जगताप यांच्यावर विशेष विश्वास होता. त्या विश्वासाच्या बळावर आमदार जगताप यांनी अहिल्यानगर शहर आणि परिसरासाठी मोठ्या प्रमाणात विकासनिधी उपलब्ध करून अनेक महत्त्वाकांक्षी विकासकामे मार्गी लावली. स्व. अजित पवार यांच्या कार्यातून समाजासाठी काहीतरी देण्याची प्रेरणा आम्हाला मिळाली आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त महिलांचा सन्मान करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला असून, भविष्यातही समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नवनाथ वाघ म्हणाले की, स्व. अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून गावातील लाडक्या बहिणींना एक छोटीशी भेट देण्याचा आमचा प्रयत्न आहे. महिलांचा सन्मान आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने साडी वाटपाचा हा उपक्रम आयोजित करण्यात आला. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आनंद पोहोचविण्याची प्रेरणा आम्हाला दादांच्या कार्यातून मिळाली. आज एक हजारांहून अधिक महिलांनी या उपक्रमात सहभाग घेतला. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आमच्यासाठी सर्वात मोठे समाधान आहे. यापुढेही गावात शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम राबवून समाजसेवेचा हा प्रवास अधिक व्यापक करण्याचा आमचा संकल्प असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## सेवा आणि समर्पण हीच रोटरीची खरी ओळख

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अमरापुर :** सेवा, समर्पण आणि मानवतेची जपणूक हेच रोटरीचे खरे ब्रीद असून, समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी प्रत्येक रोटेरियनने निस्वार्थ भावनेने कार्य केले पाहिजे, असे प्रतिपादन रोटरी इंटरनॅशनलचे माजी प्रांतपाल डॉ. हरिप्रसाद सोमानी यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीच्या पदग्रहण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी रोटरीचे नूतन अध्यक्ष रो. डॉ. पुरुषोत्तम बिहाणी, सचिव रो. प्रा. (डॉ.) गजानन लोंढे आणि खजिनदार रो. अशोक लबडे यांनी पदभार स्वीकारला.

डॉ. सोमानी म्हणाले, की रोटरीच्या जगभरातील २०० हून अधिक देशांमध्ये शाखा कार्यरत असून, सुमारे साडेबारा लाख रोटेरियन सेवाभावी कार्यात सहभागी आहेत. 'सेवा परमो धर्म' या तत्त्वावर कार्य करणारी



रोटरी संस्था समाजातील गरजू घटकांच्या मदतीसाठी सातत्याने कार्यरत आहे. एखाद्या गरजू व्यक्तीला केलेली छोटीशी मदतही त्याच्यासाठी अमूल्य ठरते. त्यामुळे समाज काय म्हणेल याचा विचार न करता निःस्वार्थ सेवाभावातून कार्य करणे, हीच खरी मानवसेवा असल्याचे त्यांनी सांगितले.

समारंभास सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव भुसारी, नगरसेवक सुनील काकडे, नीरज लांडे, विनोद मोहिते, सागर फडके, डॉ. निखील काकडे, संतोष जाधव, संजय फडके, कचरू सारडा, डॉ. सुभाष बाहेती, ऑर्थोतज्ञ डॉ. विक्रांत घनवट, तसेच दंतचिकित्सक अशोक कोल्हे, डॉ. वैद्य, डॉ. भाऊसाहेब लांडे पाटील, तसेच कारभारी नजन, संघर्ष योद्धा बबनराव ढाकणे, केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष माधव काटे, डॉ. सुयोग बाहेती, डॉ. संजय लड्डा, डॉ. विकास बेडके, डॉ. मनीषा लड्ढा, राममंदिर ट्रस्ट अध्यक्ष सुहास गालफाडे, सेवानिवृत्त उपप्राचार्य रो. किसनराव माने, डॉ. आशिष लाहोटी, इनरव्हील क्लबच्या नूतन अध्यक्षा रूपाली तडवळकर, वसुधा सावरकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## रक्तदान, वृक्षारोपण व स्वच्छता अभियानातून स्व.अजितदादा पवारांना मानवंदना

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहानिमित्त पारनेर तालुक्यात समाजोपयोगी उपक्रमांची प्रेरणादायी मालिका राबविण्यात आली. सेवा, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीवर आधारित भव्य रक्तदान शिबिर, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन तसेच स्वच्छता अभियान अशा विविध उपक्रमांद्वारे स्व. अजितदादा पवार यांच्या सेवाभावी विचारांना अभिवादन करण्यात आले. या सर्व उपक्रमांना नागरिक, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आ. काशिनाथ दाते जनसंपर्क कार्यालय, पारनेर येथे जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी ब्लड सेंटर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात १६७ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी आमदार काशिनाथ दाते यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करत, समाजहितासाठी राबविण्यात येणारे असे उपक्रम म्हणजे स्व.



अजितदादा पवार यांच्या सेवाभावी विचारांना वाहिलेली खरी आदरांजली असल्याचे सांगितले. जयंती सप्ताहानिमित्त श्रृंग ऋषी गड, भाळवणी येथे वृक्षसंवर्धन व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. मान्यवरांच्या हस्ते विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पुढील पिढीसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तसेच पारनेर शहरातील वरची वेस परिसरातही वृक्षलागवड करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. याच दिवशी पारनेर शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (पंचायत समिती), महात्मा ज्योतिबा फुले पुतळा (पारनेर वेस), सेनापती बापट स्मारक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (बाजारतळ) या परिसरात स्वच्छता करून सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ, सुंदर आणि प्रेरणादायी ठेवण्याचा संदेश देण्यात आला.

## दादांच्या अकाली निधनाने अहिल्यानगरच्या विकासाचे मोठे नुकसान : महापौर



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या कार्याचा, दूरदृष्टीचा आणि राज्याच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण केली.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुत्केकर, उपायुक्त मेहेर लहारे, जल अभियंता परिमल निकम, इंजिनिअर सुरेश इथापे, गणेश गाडळकर, आदित्य बल्लाळ, गणेश पुंड, राजेंद्र मेहत्रे, अनिल लोंढे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या अकाली जाण्याने केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर अहिल्यानगर शहराचेही मोठे नुकसान झाले आहे. दादांच्या माध्यमातून आमदार संग्राम जगताप यांनी शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला होता.

## कल्याण रोड परिसराचा पाणीप्रश्न सुटणार २ कोटींच्या नवीन टाकीचा प्रस्ताव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** कल्याण रोड परिसरातील वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेली पाण्याची टंचाई आता लवकरच दूर होणार आहे. या भागातील नागरिकांना सध्या तीन ते चार दिवसांतून एकदाच पाणी मिळते. हा गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या पुढाकारातून कल्याण रोड भागात २ कोटी रुपये खर्चून नवीन पाण्याची टाकी उभारण्याचा प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करण्यात आला आहे. सध्या या भागात शिवाजीनगर येथील १० लाख लिटर क्षमतेच्या टाकीवरून पाण्याचे वाटप केले जाते. मात्र, नवीन वसाहतींमुळे पाण्याची मागणी खूप वाढली आहे. त्यामुळे सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात या नवीन टाकीसाठी २ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. स्थायी समितीच्या मंजुरीनंतर या कामासाठी तातडीने सर्वेक्षण केले जाईल. यामध्ये जागेची निवड, लोकसंख्या आणि भविष्यातील गरज लक्षात घेऊन टाकीची क्षमता ठरवली जाणार आहे. प्राथमिक अंदाजानुसार येथे १५ ते २० लाख लिटर क्षमतेची टाकी उभारावी लागेल. महानगरपालिकेने तयार केलेल्या सुधारित पाणीपुरवठा योजनेअंतर्गत या नवीन टाकीचे काम, पंपिंग मशिनरी आणि पाईपलाईनसाठी स्वतंत्र अहवाल तयार केला जाईल. हा अहवाल आल्यानंतर लगेचच निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाईल. नवीन टाकी उभारल्यामुळे कल्याण रोड परिसरातील नागरिकांचा अनेक वर्षांचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार आहे.

## सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी आरोपीला तीन वर्ष कारावासाची शिक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** न्यायालयातील कर्मचारी वॉरंट बजाविण्यासाठी आला असता आरोपी भाऊसाहेब बाबाजी चौधरी (रा. ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) याने सरकारी कर्मचाऱ्याला सरकारी कामात अडथळा निर्माण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपावरून जिल्हा व सत्र न्यायाधीश मनीषा चराटे हम्पे यांनी आरोपी भाऊसाहेब चौधरी यांना दोषी धरून भादवि कलम ३५३ नुसार तीन वर्ष कारावासाची शिक्षा व दहा हजार रुपये दंड कलम ५०६ नुसार दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. या खटल्यात सरकारी वकील म्हणून अतिरीक्त सरकारी वकिल विष्णुदास के. भोर्डे यांनी काम पाहिले.

या खटल्याची माहिती अशी की, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर क्र. ५ यांनी दरखास्त क ४९६/२०१४ मध्ये आरोपी विरूध्द जंगम वॉरंट काढले होते. ते वॉरंट बजावणीकामी पारनेर न्यालयातील बेलिफ भाउसाहेब यादव कांबळे व इतर साक्षीदारासह आरोपी भाउसाहेब चौधरी यांचे डिक्सळ येथील घरी दि. ७/०३/२०१५ रोजी गेले असता आरोपीला त्याचा राग आला व त्याने न्यायालयीन कर्मचारी यांच्या हातातील वॉरंट हिसकावून घेवून त्याचे चार तुकडे करून फेकून दिले. मी न्यायालयाच्या हुकुमाला घाबरत नाही व परत जर वॉरंट बजावणीकामी माझ्या घरी आला तर तुला जीवे ठार करेन. म्हणून बेलिफ कांबळे यांनी पारनेर न्यायालयात लेखी रिपोर्ट दिला व त्यानंतर पारनेर पोलिस ठाण्यात आरोपीविरूध्द फिर्याद दिली. या गुन्ह्याचे दोषारोपपत्र जिल्हा न्यायालयात दाखल केले.

# स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेची विशेष स्वच्छता मोहीम

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त हुतात्मा स्मारक तसेच वीर भगतसिंग उद्यान परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याचबरोबर महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

विशेष म्हणजे महापौर ज्योतीताई गाडे यांनी स्वतः हातात खोरे, टिकाव आणि घमेले घेऊन स्वच्छता मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग नोंदवत नागरिकांमध्ये स्वच्छतेचा संदेश दिला. त्यांच्या सहभागामुळे या मोहिमेला विशेष उत्साह लाभला.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे,



स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, माजी उपमहापौर गीतांजली काळे, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे, नगरसेवक मयूर बांगरे, सुमित लोंढे, जालिंदर कोतकर, महेंद्र कांबळे, यशवंत तोडमल, सचिन गाडे, शुभम पांडुळे, डॉ. गणेश निमसे, प्रदीप पवार तसेच न्यू आर्ट्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवत 'स्वच्छ, सुंदर आणि हरित अहिल्यानगर' घडविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. स्वर्गीय अजितदादा पवार हे नेहमीच सुंदर, नियोजनबद्ध आणि विकासाभिमुख शहराची संकल्पना मांडत असत. नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा कायम प्रयत्न होता.

त्या पुढे म्हणाल्या की, त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी स्वच्छता मोहिमेसह महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षण, स्वच्छता आणि सामाजिक उत्तरदायित्व या तिन्ही गोष्टी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाच्या असून प्रत्येक नागरिकाने अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

स्वच्छता मोहिमेदरम्यान हुतात्मा स्मारक आणि वीर भगतसिंग उद्यान परिसराची साफसफाई करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन देण्यात आले. सामाजिक जाणीव, पर्यावरण संवर्धन आणि शिक्षणाचा संदेश देणारे हे उपक्रम स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त उत्साहात संपन्न झाले.

## प्रेम भारती नगर येथे सुमारे ४५ लाखांच्या बौद्ध विहाराचे भूमिपूजन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** प्रभाग क्रमांक ८ मधील प्रेम भारती नगर येथे आमदार संग्राम जगताप यांच्या विशेष प्रयत्नातून आणि मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सुमारे ४५ लाख रुपये खर्चाच्या भव्य बौद्ध विहाराच्या कामाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न झाले. या कामामुळे परिसरातील नागरिकांना धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक उपक्रमांसाठी स्वतंत्र वास्तू उपलब्ध होणार असून प्रभागाच्या विकासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे.

यावेळी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे, नगरसेवक बाबूशेठ नागरगोजे, नगरसेवक सुरेश बनसोडे, नगरसेविका सुनीता भिंगारदिवे, आशाताई कातोरे, किसन भिंगारदिवे, सुनील भालेराव, पंकज लोखंडे, सनी कदम, उत्तम भिंगारदिवे, योगेश



भोसले, बाळासाहेब गायकवाड, रवी चाबुकस्वार, शिवाजी भोसले, बाबासाहेब डोळस, उत्तम आडसुळ, रमेश पगारे, रामदास धिवर, रमेश सूर्यनारायण, सचिन कदम, आकाश देशमुख, रोहित वाकळे, अक्षय वाटमोडे, रामदास खरात, महेश वैद्य, बाळू बनकर, गौरव भिंगारदिवे, अलका पगारे, माया जाधव, सारिका गांगुर्डे, दिपाली भोसले, अनिता नांगरे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरसेविका सुनीता भिंगारदिवे म्हणाल्या की, कुमारसिंह वाकळे यांनी विकासकामांच्या माध्यमातून संपूर्ण प्रभागाचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व जाती-धर्मातील नागरिकांचा विश्वास त्यांनी संपादन केला आहे. त्यांच्या पाठपुराव्यामुळे बौद्ध विहाराचे काम मार्गी लागत असून भविष्यात या ठिकाणी विविध धार्मिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर आयोजित केले जातील.

नगरसेवक बाबूशेठ नागरगोजे म्हणाले की, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांबरोबरच विकासकामांना प्राधान्य देण्यात येत आहे. कुमारसिंह वाकळे यांच्या माध्यमातून प्रेम भारती नगरमध्ये भव्य बौद्ध विहार उभा राहत असून हा समाजासाठी अभिमानाचा विषय आहे.



## दोन गुंठ्यांत रेशीम उद्योगाची यशोगाथा

**राजाराम देवढे । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** ग्रामीण भागातील युवकांनी नोकरीच्या मागे न लागता आधुनिक शेतीपूरक व्यवसाय स्वीकारल्यास चांगले आर्थिक उत्पन्न मिळू शकते, याचे प्रेरणादायी उदाहरण जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील युवक अविनाश बाळू लबडे यांनी घालून दिले आहे. त्यांनी अवघ्या दोन गुंठे जागेत रेशीम उद्योग सुरू करून अल्पावधीत उल्लेखनीय यश मिळवले आहे.अविनाश लबडे यांनी सांगितले की, रेशीम उद्योगातील एक बॅच तयार होण्यासाठी साधारण ४५ दिवसांचा कालावधी लागतो. प्रत्येक बॅचनंतर सर्व खर्च वजा जाता सुमारे ८० हजार रुपये निव्वळ उत्पन्न मिळते. कमी कालावधीत चांगला आर्थिक परतावा मिळत असल्याने येत्या काळात हा व्यवसाय आणखी वाढविण्याचा त्यांचा मानस आहे.सध्या बाजारात रेशीम कोषाला प्रति किलो १०० ते १३० रुपये दर मिळत असल्याने या व्यवसायाला चांगली मागणी आहे. कमी क्षेत्रात अधिक उत्पन्न मिळवून देणारा हा व्यवसाय शेतकरी व ग्रामीण युवकांसाठी फायदेशीर ठरत आहे.ग्रामीण भागातील युवकांनी केवळ नोकरीच्या शोधात न राहता स्वतःचा उद्योग-व्यवसाय उभारण्याचा विचार करावा. स्वावलंबी व्यवसायातून आर्थिक प्रगती बरोबरच इतरांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, असा संदेश अविनाश लबडे यांनी दिला आहे.



## श्री व सौ डॉ. लेव्हरकर यांना अ‍ॅक्युपंक्चर रत्न पुरस्कार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** विठ्ठलवाडी (ता. शिरुर) येथील सुप्रसिद्ध क्युपंक्चरिस्ट डॉ. सुभाष मधूकरराव लेव्हरकर व डॉ. वंदना सुभाष लेव्हरकर यांना नुकतेच आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा महा क्युपंक्चर रत्न पुरस्कार २०२६ हा देऊन सन्मानित करण्यात आले आहे. विठ्ठलवाडी (ता. शिरुर) येथील सुप्रसिद्ध क्युपंक्चरिस्ट डॉ. सुभाष मधूकरराव लेव्हरकर व डॉ. वंदना सुभाष लेव्हरकर यांनी परिसरात क्युपंक्चर च्या माध्यमातून नागरिकांनी योग्य सुविधा देण्याचे कार्य केले असून त्यांच्या कार्याची दखल घेत आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा महा क्युपंक्चर रत्न पुरस्कार २०२६ हा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात देऊन सन्मानित करण्यात आले, यावेळी सिने कलावंत डॉ. सुयोग गोऱ्हे , राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्यांक विभाग प्रदेशाध्यक्ष ड. नाझेर काझी, ड. दत्तात्रय जाधवर, ड. नागेश सोनुने, चेअरमन डॉ. सतीश कराळे, आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व्हाईस चेअरमन डॉ. नितीनराजे पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबुराव कानड यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते, क्युपंक्चरिस्ट यांच्या कार्याचा हा सन्मान असताना सदर पुरस्काराला महाराष्ट्रातील क्युपंक्चर थेरपीस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर सुप्रसिद्ध क्युपंक्चरिस्ट डॉ. सुभाष मधूकरराव लेव्हरकर व डॉ. वंदना सुभाष लेव्हरकर यांना महा क्युपंक्चर रत्न पुरस्कार मिळाल्याने त्यांचे परिसरातून कौतुक होत आहे.

## खामुंडी-बदगी रोडवर अज्ञात वाहनाच्या धडकेत तरस ठार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** खामुंडी(ता. जुन्नर )-बदगी रोडवर मंगळवारी सकाळी अज्ञात वाहनाच्या धडकेत एका प्रौढ पट्टेदार तरसाचा मृत्यू झाला. दि. २१ जुलैच्या रात्रीच्या सुमारास धर्मनाथ टेकडी परिसरातील रस्त्यावर तरस मृतावस्थेत आढळून आला.



स्थानिकांनी तात्काळ वन विभागाला माहिती दिली. मृत तरस वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत संरक्षित प्रजाती आहे. अन्नाच्या शोधात रस्ता ओलांडत असताना भरधाव वाहनाने त्याला धडक दिल्याचा अंदाज आहे. माहिती मिळताच वन विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले. त्यांनी मृतदेहाचा पंचनामा करून शासकीय नियमानुसार विल्हेवाट लावली. ओतूर वनपरीक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, जंगल व शिवार भागातून जाताना वाहनाचा वेग कमी ठेवावा. रात्रीच्या वेळी वन्यजीव रस्त्यावर येण्याची शक्यता जास्त असते. अशा प्रकारच्या अपघातांमुळे परिसरात वन्यजीव आणि वाहतूक यांच्यातील संघर्षाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# भाजपा शिरूर शहर महिला आघाडीच्या अध्यक्षा बिरादार यांच्या पाठपुराव्याला यश

## शिरूर पोस्ट ऑफिसमधील आधार सेवा केंद्र पुन्हा सुरू

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर पोस्ट ऑफिसमधील आधार सेवा केंद्र २०२३ पासून बंद असल्याने नागरिकांना आधार कार्ड नोंदणी, अद्ययावतीकरण व इतर सेवांसाठी खासगी केंद्रांवर जास्त शुल्क भरून कामे करावी लागत होती. याबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने भाजपा शिरूर शहर महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया बिरादार यांनी सातत्याने पाठपुरावा करत तहसील कार्यालय तसेच पोस्ट विभागाकडे अनेक वेळा निवेदने देऊन आधार सेवा केंद्र सुरू करण्याची मागणी केली होती. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नव्हती.

दरम्यान, बारामती विभागाचे अधीक्षक डाकघर केतन डी. शित्रे हे शिरूर दौऱ्यावर आले असताना प्रिया बिरादार यांनी महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसह पोस्ट ऑफिसमधील प्रत्यक्ष परिस्थिती फोटो व व्हिडिओद्वारे त्यांच्या निदर्शनास आणून दिली. नागरिकांची होत असलेली गैरसोय स्पष्ट करत तातडीने केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली. या घटनेची तात्काळ दखल घेत अधीक्षक केतन डी. शित्रे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आधार सेवा केंद्र त्वरित सुरू करण्याचे आदेश दिले. त्यांच्या उपस्थितीतच फलक लावून आधार सेवा केंद्र पुन्हा सुरू करण्यात आले.




यामुळे आता शिरूर शहरातील नागरिकांना शासनाने निश्चित केलेल्या अधिकृत दरात नवीन आधार नोंदणी, आधारमधील नाव, पत्ता, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक आदी तपशीलांमध्ये दुरुस्ती, बायोमेट्रिक अद्ययावत करणे तसेच णखऊ-ख मान्यताप्राप्त इतर आधार सेवा शिरूर पोस्ट ऑफिसमध्येच उपलब्ध होणार आहेत. आधार अद्ययावतीकरणासाठी आवश्यक कागदपत्रांसह नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधीक्षक केतन डी. शित्रे यांनी केले आहे. याबाबत बोलताना प्रिया बिरादार म्हणाल्या, सामान्य नागरिकांना खासगी केंद्रांवर जादा शुल्क भरावे लागू नये आणि त्यांना शासनाच्या अधिकृत दरात आधार सेवा मिळावी, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्याला यश आले असून ही सुविधा नागरिकांसाठी पुन्हा सुरू झाली आहे. या वेळी भाजपा शिरूर शहर महिला आघाडीच्या उपाध्यक्षा सृष्टी करंजुले तसेच महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.



## सासवडच्या एम ई एस विद्यालयातील चिमुकले झाले पंढरीचे वारकरी..

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** मोठ्या भक्तीभावाने साजरी होणारी श्री क्षेत्र पंढरपूरची आषाढी एकादशी काही दिवसांवर येऊन ठेपली असुन महाराष्ट्राच्या विविध भागातून संतांच्या पालख्या विठ्ठल भेटीसाठी वारीच्या वाटेवर चालतं आहेत. विठ्ठलभक्ती व संत परंपरेचा हा अनुभव शाळेतील छोट्या विदयार्थ्यांना मिळावा या हेतूने सासवड येथील एमईएस इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये नुकताच पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शुशोभीत केलेली पालखी वारकऱ्यांच्या वेषातील चिमुकले, टाळ, मृदंग, हार्मोनियम वरचा हरीनामाचा गजर, संत परंपररा अधोरेखित करणारी नाटिका, पालखी सोहळ्याचे महत्व सांगणारी मनोगते या मुळे हा सोहळा विशेष लक्षवेधी झाला.

विद्यालयाच्या मुख्यध्यापिका सरोज जांगडा यांनी यावेळी संतरुपी बालके व पालखीची पुजा करून मुलांना पालखी व संतविचार याविषयी माहिती दिली.भाऊसाहेब येळे,मानसी बोरकर, रुचीरा गार्डी तसेच स्वराज राजीवडे व गार्गी पांढरे यांची समयोचित मनोगते, पूर्व माध्यमिक विभागाच्या मुलांची नाटिका, अंकिता जगताप, योगिता जाधव व अश्विनी खळदकर यांची भजने, नीता जगताप यांचे सूत्रसंचालन व अखेरीस पसायदान यामुळे या सोहळ्याची रंगत वाढली.

## स्कूल बसला वाचवताना एसटीचा तिहेरी अपघात

### आयशर टेम्पोला मागून धडक: मोठी दुर्घटना टळली

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरील कोळवाडी येथे स्कूल बसला वाचविण्याच्या प्रयत्नात एसटी बसचा तिहेरी अपघात होऊन मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. या अपघातात एसटी बसचालकासह काही प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत.



ही घटना मंगळवार (दि. २१) सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास घडली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, बोईसर आगाराची एसटी बस कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरून प्रवाशांना घेऊन जात असताना समोर आलेल्या स्कूल बसला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. तसेच बस समोरील आयशर टेम्पो अचानक थांबल्याने एसटी बसने समोरील आयशर टेम्पोला मागून जोरदार धडक दिली. या धडकेमुळे तिहेरी अपघात घडला.

अपघाताच्या वेळी एसटी बसमध्ये सुमारे २० प्रवासी प्रवास करत होते. धडकेचा जोर मोठा असल्याने बसचालकासह काही प्रवासी जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेत जखमींना बाहेर काढले आणि उपचारासाठी ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले.या अपघातात दोन वाहनांचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.जखमींची अचूक संख्या व पूर्ण परिचय अद्याप स्पष्ट झालेला नसून, अधिक माहितीची प्रतीक्षा आहे. ओतूर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.



## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणारे महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात त्यांच्या जयंतीनिमित्त आदरपूर्वक अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात आयोजित कार्यक्रमात कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, विविध महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठांचे कुलगुरू व त्यांचे प्रतिनिधी, विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रविंद्र शिंगणापूरकर, अधिसभा सदस्य शंतनु लामदाडे व सचिन गोरडे, वित्त व लेखाधिकारी सीएमए डॉ. चारुशीला गायके, प्रा. डॉ. विलास आढाव यांच्यासह विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी अजितदादा पवार यांनी राज्याच्या विकासासाठी तसेच पायाभूत सुविधा, जलसंपदा, शिक्षण आणि कृषी क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या सार्वजनिक जीवनातील कार्याचा आदर्श समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. उपस्थितांनी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले.

## पिंपळसूटी येथे बिबट्याच्या हल्ल्यात चिमुकलीचा मृत्यू

**आकाश भोरडे । राष्ट्र सह्याद्री**

**पिंपळसुटी भागात नेहमीचेच बिबट्याचे हल्ले होत असताना आज घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असून वनविभागाने परिसरात सर्च ऑपरेशन करून जांबुत व पिंपरखेड या भागात ज्याप्रमाणे बिबटे जेरबंद केले तसे ऑपरेशन राबवावे व बिबटे जेरबंद करावे अशी मागणी घोडगंगा कारखाना कारखान्याचे माजी संचालक शशिकांत वेताळ यांनी केली आहे.**

**तळेगाव ढमढेरे :** पिंपळसूटी (ता. शिरुर) येथील फलकेमळा परिसरात आज पहाटेच्या सुमारास बिबट्याने केलेल्या हल्ल्यात पाच वर्षीय चिमुरडीचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून भाग्यश्री संदीप वारे असे मृत चिमुरडीचे नाव असून शिरुर पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असताना वनविभागाच्या वतीने बिबट्या जेरबंद करण्याचे प्रयत्न सुरु करण्यात आले आहे.

पिंपळसूटी (ता. शिरुर) येथील फलकेमळा येथे मच्छिंद्र प्रल्हाद भोसले यांच्या कडे कामाला असलेले दांपत्य त्यांच्या गोठ्यामध्ये झोपलेले असताना पहाटेच्या सुमारास अचानक भाग्यश्री या चिमुरडीच्या ओरडण्याचा आवाज आल्याने झोपलेले व्यक्ती जागे झाले असता बिबट्या चिमुरडीला फरपटत घेऊन जात असल्याचे दिसून आल्याने संदीप वारे यांनी आरडाओरडा केल्याने अन्य नागरिक जागे झाले, परंतु बिबट्याने भाग्यश्रीसह शेजारील उसाच्या शेतात धूम ठोकली, त्यांनतर ग्रामस्थांनी शिरुर वनविभागाला माहिती देत भाग्यश्रीचा ऊसाच्या शेतात शोध घेतला असता तिचा मृतदेह ऊसाच्या शेतात मिळून आला, सदर घटनेत भाग्यश्री संदीप वारे (वय ५ वर्षे सध्या रा. फलके पिंपळसूटी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. करोडी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर) या चिमुरडीचा मृत्यू झाला असून याबाबत बाबासाहेब कोंडीबा वारे (वय ३० वर्षे सध्या रा. फलके पिंपळसूटी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. करोडी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे आकस्मात मृत्यूची नोंद केली तर घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस व शिरुर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांसह आदींनी घटनास्थळी धाव घेत बिबट्या जेरबंद करण्याबाबतची कार्यवाही सुरु केली आहे.



# बारामतीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन..!

## ५७ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध सामाजिक संघटनांचा संयुक्त अभिवादन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** विश्वविख्यात साहित्यिक, साहित्यरत्न व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५७ व्या पुण्यतिथीनिमित्त बारामतीतील साठेनगर येथे अण्णाभाऊ साठे तरुण मंडळ तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या सामाजिक, साहित्यिक व परिवर्तनवादी कार्याला विनम्र अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास बारामती नगराध्यक्ष सचिन सातव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष किरण इंगळे तसेच बारामती वकील संघटनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष अ‍ॅड. सचिन वाघ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी नगरसेवक राजेंद्र सोनवणे, गणेश जोजारे, अमोल कावळे, नगरसेविका शर्मिलाताई



ढवाण पाटील, मनिषा बनकर, अ‍ॅड. पी. टी. गांधी, पत्रकार तानाजी पाथरकर, सामाजिक कार्यकर्ते ओंकार देशमुख, संदीप बनकर, टी. व्ही. मोरे, दिलीप ढवाण पाटील, शुभम अहिवळे, प्रतीक ढवाण पाटील, योगेश महाडीक, गजानन गायकवाड, राजेश कांबळे, महावीर गायकवाड, विशाल खंडाळे, संजय वाघमारे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन माजी उपनगराध्यक्ष विजयराव खरात, नगरसेविका प्रतिभा खरात, अण्णाभाऊ साठे तरुण मंडळ, लहुजी प्रतिष्ठान पॉइंट, लहुजी शक्ती सेना, अण्णाभाऊ साठे मित्र मंडळ, जय लहुजी फ्रेंड सर्कल आणि क्रांतीसेना प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, समाजप्रबोधन आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# द • ख • ल

## ढोरसडे येथे अजित पवार यांना आदरांजली



**दहिगाव ने :** ढोरसडे - आंत्रे ता. शेवगाव येथील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात महाराष्ट्र राज्याचे नेते आदरणीय दिवंगत अजितदादा पवार जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमा पुजन व पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले. प्रसंगी माजी सरपंच रघुनाथ माळवदे, लोकनियुक्त सरपंच माऊली निमसे, उपसरपंच चंद्रकांत ठोंबळ ,ग्रामपंचायत सदस्य दीपक कणके, सदस्य किशोर वाघमारे ,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष राम काळे, ग्रामविकास अधिकारी नजन भाऊसाहेब, राहुल निमसे, किशोर माळवदे ,नाना तांबे ,कचरू एरंडे, नाना राऊत, चंद्रकांत खंबरे, रामभाऊ मगर, दतु खंबरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अनाथ, गरीब, विद्यार्थ्यांसाठी 'एक रुपयाची उमेद' उपक्रमास सुरुवात



**शहरटाकळी :** कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपत 'एक रुपयाची उमेद' ही गरजू विद्यार्थी मदत योजना विद्यालयाच्या प्राचार्या अंजली चिंतामण यांच्या संकल्पनेतून अनाथ, निराधार, गरीब,गरजू विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,पर्यवेक्षक, मुख्याध्यापक, समाजातील दानशूर व्यक्ती हे कमीत कमी एक रुपयापासून आपल्या इच्छेप्रमाणे रक्कम या पेटीमध्ये जमा करू शकतील. जमा झालेल्या रकमेतून विद्यालयातील अनाथ, निराधार, गरीब, गरजू विद्यार्थ्यांसाठी पेन, पेन्सिल, वही, पुस्तक, दप्तर, शालेय गणवेश ,चप्पल आदी साहित्य खरेदी करून त्यांना दिले जाईल असे प्राचार्या चिंतामण म्हणाल्या. या योजनेचे उद्घाटन विद्यालयाच्या प्राचार्या अंजली चिंतामण यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी एक रुपयाची उम्मीद या पेटीमध्ये शिक्षक बंधू भगिनी व विद्यार्थ्यांनी आपापल्या इच्छेप्रमाणे रक्कम टाकण्यास सुरुवात केली. या उपक्रमाचा अनेक विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. यावेळी समाजातील दानशूर व्यक्तींनाही यामध्ये पैसे टाकण्याचे आवाहन त्यांनी केले.

## मुंगीत विविध मागण्यासाठी उपसरपंचासह ग्रामस्थांचे उपोषण सुरू



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील मुंगी गावातील विविध विकास कामासह वेग - वेगळ्या विभागाशी निगडीत असलेल्या एकूण ३३ प्रमुख मागण्यासाठी उपसरपंच सौ. वंदनाताई भाऊसाहेब घोटाळे ,ग्रामपंचायत सदस्य सौ.अंजनाबाई दिगंबर बल्लाळ,सौ.आशाबाई रमेश घोरपडे व विनोद बदाम घोरपडे यांच्यासह भाऊसाहेब घोटाळे, दिगंबर बल्लाळ, ज्ञानदेव घोरपडे,नारायण साबळे व यमुनाबाई उत्तम वाल्हेकर यांनी गावातीलच भवानीमाता मंदिरामध्ये अन्नत्याग उपोषण सुरू केले असून निवेदनावरील एकूण मागण्यापैकी वीज महावितरण कंपनीच्या अंतर्गत असलेल्या विषयावर महावितरणकडून आदल्या दिवशीच लेखी पत्र देऊन उपोषण स्थगित करण्याबाबत कळवले होते. मात्र इतर विषयासाठी सुरू केलेले उपोषण सुरू असताना ग्रामविकासअधिकारी आर आर राठोड यांनीही त्याच्या स्वाक्षरीने अनेक विषयाला अनुसरून लेखी पत्र उपोषणकर्त्यांना देऊन सकारात्मक चर्चा केली असता त्या पत्रावर व झालेल्या चर्चेवर उपोषणकर्त्यांचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी आपले उपोषण सुरू ठेवले असून या वेळी झालेल्या चर्चेत माजी सरपंच राजेंद्र ढमढेरे, बबन भुसारी यांनीही आपला सहभाग नोंदवलेला आहे.मात्र त्यास यश आले नसून तहसीलदार व गटविकासाधिकारी यांनी समक्ष येऊन आमच्यासोबत चर्चा करावी या मागणीवर उपोषणकर्ते ठाम असल्याने उपोषण सुरूच राहिले आहे.



## पंढरपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षलागवड

**भाळवणी :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर आणि पालखी मार्गांना हिरवेगार बनवण्यासाठी २२ जुलै २०२६ रोजी वाखरी येथे एका मोठ्या पर्यावरण मोहिमेचा श्रीगणेशा झाला. पंढरपूर देवस्थान ट्रस्ट, वृक्ष दाई संस्था, वाखरी ग्रामपंचायत आणि पंढरपूर नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'हरित वारी' या विशेष संकल्पने अंतर्गत रस्ता दुतर्फा वृक्षलागवड कार्यक्रमाचा शानदार शुभारंभ करण्यात आला. यावेळी पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांच्या हस्ते ५६ वृक्षांची लागवड राज्याचे कृतीशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून या मोहिमेची सुरुवात करण्यात आली. पंढरपूर देवस्थानचे सदस्य तथा जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. शिवाजी बापू मोरे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित केला गेला. पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांच्या शुभहस्ते वाखरी येथील प्रसिद्ध रिंगण सोहळ्याच्या मैदानात रस्ता दुतर्फा ५६ वृक्षांची लागवड करून या व्यापक अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. सात पालखी मार्गांवर होणार वृक्षलागवड - देहू ते पंढरपूर या मुख्य मार्गासह पंढरपूरला जोडणाऱ्या एकूण ७ प्रमुख पालखी मार्गांवर आणि १४० इतर संपर्क रस्त्यांवर रस्ता दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जाणार आहे. यामुळे दरवर्षी वारीसाठी पायी येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना भविष्यात सुखद आणि थंडगार सावली मिळणार असून, पर्यावरणाचा समतोल राखण्यास मोठी मदत होणार आहे.

# ढोरजळगांवकरांना जोरदार पावसाची प्रतिक्षा

## पाऊस नसल्याने पीके जमीनीला झाली ठेंगणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील ढोरजळगांव परीसरात अत्यल्प पावसामुळे पीके धोक्यात आली असुन ढोरजळगांव मंडळात यावर्षी अत्यल्प पावसावर सर्वाधिक तुर सोयाबीन उडीद पीक पेरा करण्यात आला आहे.

ढोरजळगांव व परीसरात यावर्षी पाऊसाचे आगमन हे काहीसे उशीरा म्हणजे २० जुन नंतर झाले तेही अल्प प्रमाणात तरीही शेतकऱ्यांनी पीकांची लागवड पेर केली पीक उगवून आले परंतु जुलै महिना संपत आला तरी अजुन चांगला जोरदार पाऊस या परीसरात पडला नसल्याने पीके जमीनीला ठेंगणी झाली असुन अधुन मधुन झिमझिम पावसामुळे तणांची मोठी वाढ झाली असुन खुरपणी व तन नियंत्रणासाठी फवारणी करण्यासारखा पाऊस उपलब्ध नसल्याने पीके करपण्याचा धोका निर्माण झाला आहे.

ढोरजळगांव परीसर पुर्वी कपाशी पिकांचे अगार म्हणून ओळखले जात असत गेल्या काही वर्षांत मजुरांचा अभाव ढोरानदीवरील बंधा-याच्या मालिकेमुळे शेतकरी ऊस पिकांकडे वळला असुन सलग तीन वर्षे जोरदार पावसामुळे विहीरी व कंपुननलिका पाण्यात वाढ झाली होती परंतु यावर्षी जुन महिना कोरडाच गेला असुन जुलै संपत आला तरी जोरदार पाऊस पडायला तयार नसल्याने ऊसाचे पीक वय जसे वाढत चालले तसे ठेंगणेच राहिले असुन ऊस पिकाला चांगल्या पाऊसाची अपेक्षा असते व तसा पाऊस अजुन पडलेला नाही. दरवर्षी ढोरजळगांव परीसरात कापुस वेचनीस मजुरांची मनधरणी करण्याची वेळ येत असल्याने शेतकरी तुर, मूग, सोयाबीन,बाजरी या पिकांना प्राधान्य क्रम देताना दिसुन येत असुन कमी पाण्यात व कमी कालावधीत येणारे पीके घेण्यावर शेतक-यांचा कल दिसून येत आहे.

# दिल्लीतील लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ पाथर्डीत आघाडीचे आंदोलन



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** राजधानी दिल्लीतील जंतर-मंतरवर घडलेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी शहरातील स्व.वसंतराव नाईक चौक येथे आघाडीचे कार्यकर्ते व शिक्षण क्षेत्रातील तज्ञांनी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले. यावेळी असुभाष केकान, किसन आव्हाड, नासिर शेख, देवा पवार, डॉ.दीपक देशमुख, चांद मणियार, डॉ. जी.पी.ढाकणे, दिगंबर गाडे, प्रवीण वाघमारे, पांडुरंग मरकड, श्रीकांत काळोखे, योगेश रासने, संदीप काटे, जुनेद पठाण, गणेश चितळकर, रामदास बर्डे, गणेश दिनकर कार्यकर्ते सहभागी झाले. या सर्व घटनांना केंद्र सरकार जबाबदार असल्याचे ते म्हणाले. महसूल विभागाचे प्रतिनिधी प्रदीप मगर यांना आंदोलकांच्या वतीने निवेदन स्वीकारले. लोकशाही मार्गाने योग्य मागण्या घेऊन उपोषण करणाऱ्यांना बळजबरीने चादरीत गुंडाळून उचलण्यात आले. याचा निषेध म्हणून आंदोलन करणाऱ्या देशभरातील हजारो विद्यार्थी -विद्यार्थिनींना पोलिसांच्या काठ्यांनी बडवले जाते. स. पो. उपनि. नितीन दराडे, नागेश वाघ व इतर पोलीस कर्मचारी बंदोबस्त ठेवला.

# दिल्लीतील लाठी हल्ल्याचा करंजीत निषेध

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**करंजी :** दिल्ली येथील जंतर मंतर वर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व शास्त्रज्ञ सोनम वांगचूक, विद्यार्थी नेत्या कॉम्रेड नेहा बोरा,अभिजीत दिपके आणि इतर आंदोलन कर्त्यांवर होत असलेल्या लाठी चार्ज व दडपशाहीच्या निषेधार्थ आज करंजी येथे सर्व पक्षीय एकत्र येत निषेध नोंदविण्यात आला.

यावेळी शिक्षण मंत्री हाय हाय , मोदी सरकार हाय हाय , शिक्षण मंत्री राजीनामा द्या, दडपशाही बंद करा , विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नका. अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. आंदोलकाच्या वतीने करंजी ग्रामपंचायतचे सरपंच शिवसेनेचे जिल्हा शिवसेना उपप्रमुख रफिक शेख यांनी आपल्या भाषणामध्ये सरकारच्या दडपशाही विरोधात जोरदार घोषणा दिल्या व सरकारचा निषेध करत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. सामाजिक कार्यकर्ते छान राजक्षेत्रे म्हणाले कीदेशातील शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल घडून आणणे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे तसेच राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा संदर्भातील विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांची पूर्तता करण्यासाठी दिल्लीमध्ये विद्यार्थ्यांचे जन आंदोलन उभे करण्यात आले मात्र त्यांच्यावरच पोलिसांनी लाठी हल्ला केला ही अत्यंत निंदनीय बाब असून त्याचा निषेध करत असल्याच सांगीतले.

यावेळी चंद्रशेखर अकोलकर, रघुनाथ अकोलकर, सुनील अकोलकर, अभय गुगळे, गणेश अकोलकर, अंबादास नजन, अर्जुन भिटे,बाळासाहेब अकोलकर, राजेंद्र अकोलकर, बद्रीनाथ अकोलकर, झुंबर क्षेत्रे, संपत क्षेत्रे, सुभाष अकोलकर, विकास क्षेत्रे, अशोक चव्हाण, पप्पू अकोलकर,पवन क्षेत्रे, रामा शिंदे, बाबा क्षेत्रे, फिलिप क्षेत्रे, पंडित राठोड, प्रकाश क्षेत्रे सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

## रांजणी ते मोहटा देवी महिला पायी रथ दिंडी सोहळा

**नगर तालुका :** सालाबाद प्रमाणे रांजणी ता. नगर येथील स्व. अॅड. प्रभाकर भानुदास गोरे यांच्या प्रेरणेने रांजणी ते मोहटा देवी पायी दिंडी सोहळा मंगळवार ते बुधवार आयोजीत करण्यात आलेली आहे. या दिंडी सोहळयाच्या परंपरेला ३३ वर्ष पुर्ण होत असून चालु वर्ष हे ३४ वे वर्ष आहे. मोहटादेवी भक्तगण यांनी रथ पायी महिला दिंडीचे आयोजन केलेले आहे. हा रथ म्हणजे महाराष्ट्रातील पहिली मोहटा देवी रथ पायी दिंडी सोहळा आहे. ही दिंडी म्हणजे महिलांचे शिस्तप्रिय दिंडी अशी ओळख आहे. या दिंडीचे वैशिष्ठ म्हणजे कुठल्याही भक्त गणांकडून शुल्क आकारले जात नाही. या दिंडीत परिसरातील अनेक मोहटा देवीचे भक्तगण व गावगावचे आरादी मंडळी या सोहळयात भक्तीभावाने सहभागी होतात.

# हिरा कृषी सेवा केंद्रात कंपनीच्या युरियाचे वाटप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंद्यातील हिरा कृषी सेवा केंद्रात कंपनीकडून प्राप्त झालेल्या युरियाच्या साठ्याचे वाटप सुरू करण्यात आले आहे. युरिया उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी मागणीच्या तुलनेत उपलब्ध साठा अपुरा पडण्याची शक्यता असल्याने शासनाने तातडीने बफर स्टॉक खुला करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

खरीप हंगामातील पिकांना सध्या युरियाची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे. गेल्या काही दिवसांपासून खतांच्या तुटवड्यामुळे अनेक शेतकऱ्यांना कृषी सेवा केंद्रांच्या फेऱ्या माराव्या लागत होत्या. आता हिरा कृषी सेवा केंद्रात युरियाचे वितरण सुरू झाल्याने काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी वाढती मागणी लक्षात घेता अतिरिक्त साठ्याची गरज भासत आहे.

शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे बफर स्टॉक तातडीने खुला करून युरियाचा पुरेसा पुरवठा करण्याची मागणी केली आहे. तसेच खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने नियमित तपासणी करून पुरवठा सुरळीत ठेवावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात येत आहे. वेळेवर खत उपलब्ध झाल्यास खरीप पिकांची वाढ चांगली होऊन उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# ढोरजळगांव परिसरातील राजकीय हालचालींना वेग

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायतींच्या सरपंचांचा कार्यकाळ संपलेला असून, सध्या या ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांमार्फत सुरू आहे. आता ग्रामपंचायत निवडणुकांचे पडघम ग्रामीण भागात धुमु लागल्याने ढोरजळगांव परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून गावागावांत इच्छुक उमेदवारांनी मोर्चेबांधणीला वेग दिला आहे.भेटी गाठी बरोबर प्रभागनिहाय उमेदवाराची चाचपणी सुरू असुन सरपंच पद जनतेतुन असल्यामुळे सदस्य पदाचे उमेदवार ठरविण्यासाठी रणनिती आखली जात आहे.

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. यासाठी एप्रिल २०२६ मधील मतदार यादी ग्राह्य धरून प्रत्येक गावातील वार्डनिहाय मतदारांची नोंदणी व पडताळणी सुरू आहे. प्रशासनाचे अधिकारी आणि कर्मचारी गावोगावी जाऊन मतदार याद्या अद्ययावत करत असून, ८ ऑगस्ट नंतर प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर त्यानंतर मतदार सुनावणी होणार असून अंतिम मतदार यादी आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात प्रसिद्ध होणार असुन

**ग्रामपंचायत निवडणुकांची रणधुमाळी सुरू प्रभागनिहाय मतदार याद्या अंतिम टप्प्यात**

मतदार यादी अंतिम झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात ग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे गावागावांत राजकीय हालचालींना वेग आला असून, विविध गट-पॅनेलची जुळवाजुळव, कार्यकर्त्यांच्या बैठका, उमेदवारांची चाचपणी आणि प्रचाराची प्राथमिक तयारी सुरू झाली आहे. अनेक गावांमध्ये इच्छुक उमेदवारांनी घरभेटी, संपर्क अभियान आणि मतदारांशी संवाद सुरू केल्याने निवडणुकीचे वातावरण दिवसेंदिवस रंगत आहे. गेल्या काही महिन्यांपासून प्रशासकीय कारभार सुरू असल्याने नागरिकांमध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी कधी मिळणार याची उत्सुकता आहे. यंदा अनेक गावांत नव्या नेतृत्वाला संधी मिळणार की विद्यमान गट पुन्हा सत्ता राखणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे ढोरजळगांव परिसरातील आगामी ग्रामपंचायत निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे चित्र आहे.

# गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी शासन आपल्या दारी ही संकल्पना उपयुक्त : ना. शिंदे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याचा महायुतीचा प्रयत्न आहे. शासन आपल्या दारी ही संकल्पना त्याचीच सुरुवात आहे. राज्यात युवा, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक असलेल्या महसूल यासह विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी आणि अल्पाधित उपलब्ध करून देणे हाच या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे यांनी केले. ते कर्जत येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते.

कर्जत उपविभाग महसुल व वनविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री फडणवीस यांचा वाढदिवस आणि स्व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त दादा पाटील महाविद्यालयाच्या शारदाबाई पवार सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास विधान परिषदेचे आमदार सुनील कर्जतकर यांच्यासह कर्जत-जामखेडचे सर्व प्रशासकीय प्रमुख, राजकीय पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केले. आभार तहसीलदार रवी सतवन आणि धनंजय बांगर यांनी मानले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, छाया शेलार, काकासाहेब तापकीर, राजेंद्र फाळके, शेखर खरमरे, अनिल गदादे, अमित चिंतामणी, विनोद दळवी, राजेंद्र गुंड, शांतीलाल कोपनर, दादा सोनमाळी यांच्यासह कर्जत-जामखेड तालुक्यातील कृषी, महसूल, आरोग्य, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, भूमिअभिलेख, नगरपरिषद, वनविभाग, शिक्षण विभाग, पोलिस प्रशासन, महावितरण इत्यादी प्रशासकीय विभागाचे तालुका अधिकारी उपस्थित होते.

# स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी :** स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या इंदिरा गांधी पॉलिटेक्निक, बेलवंडी येथे वृक्षारोपण व प्रतिमापूजनाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थी, पालक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण महाविद्यालय परिसर पर्यावरण संरक्षणाच्या संदेशाने दुमदुमून गेला.

यावेळी प्रा. डॉ. प्रशांत भोईटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पर्यावरण संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन यासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे, विभागप्रमुख हवालदार सर, नातू सर, इथापे



सर, शिंदे सर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे हा वृक्षारोपण उपक्रम प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# साईसेवा पतसंस्थेतील ३ कोटींचे वाटप रखडले!

**पंधरा दिवसांपासून प्रशासकच नाही**

**रुग्ण, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि लग्नासाठी मदतीची प्रतीक्षा**

**प्रशासकाचा कार्यकाळ संपत आल्याने संभ्रम**

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील साईसेवा सहकारी ग्रामीण पतसंस्थेवर सहकार आयुक्त (नाशिक) यांच्या आदेशानुसार प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, नियुक्त प्रशासकाविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्यानंतर गेल्या पंधरा दिवसांपासून संस्थेला कार्यरत प्रशासक नसल्याचा आरोप केला जात आहे. परिणामी, ठेवीदारांची अत्यावश्यक आर्थिक मदतही रखडल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक सहकार आयुक्तांच्या आदेशानुसार गंभीर आजारांवरील उपचार, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक खर्च, ज्येष्ठ नागरिकांच्या

**'निल' दाखल्यांचे गूढ; कर्ज फेडले की कागदावरच गायब?**

निल दाखल्यांचा संशय: साईसेवा पतसंस्थेतील कथित गैरव्यवहारात थकबाकी नसल्याचे 'निल' दाखले संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

कठोर चौकशीची मागणी: कर्जदारांनी दिलेली रक्कम नेमकी कधी, कुठे आणि कशी जमा झाली, याची प्रत्येक व्यवहारासह सखोल पडताळणी करण्याची मागणी ठेवीदारांकडून होत आहे.

ठेवीदार संकटात: मोजक्या लोकांच्या कथित गैरव्यवहारामुळे हजारो सर्वसामान्य ठेवीदारांची आयुष्यभराची बचत मात्र टांगणीला लागली आहे.

गरजा तसेच लग्नकार्यासाठी सुमारे ३ कोटी रुपयांचे वाटप करण्यात येणार होते. मात्र, प्रशासक नसल्यामुळे ही प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली असून गरजू ठेवीदारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

ठेवीदारांचा आरोप आहे की, प्रशासकाची नियुक्ती होऊनही अपेक्षित कामकाज झाले नाही. आता प्रशासकाचा सहा महिन्यांचा कार्यकाळ संपत आला असून, पुढे नवीन प्रशासक नेमला जाणार का, विद्यमान कार्यकाळाला मुदतवाढ दिली जाणार का, अथवा संस्थेची निवडणूक घेऊन नवीन संचालक मंडळ स्थापन केले जाणार, याकडे ठेवीदारांसह तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, आर्थिक अडचणीत सापडलेल्या ठेवीदारांनी तातडीने कार्यरत प्रशासक नेमून रखडलेले ३ कोटी रुपयांचे वाटप सुरू करावे, अशी मागणी सहकार विभागाकडे केली आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

## मुळा धरणात १७२४३ क्युसेसने नवीन पाण्याची विक्रमी आवक

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यात व परिसरात काल रात्री पासून पावसाचा हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू असल्यामुळे या संततधार पावसामुळे वातावरणात गारवा मोठ्या प्रमाणात गारवा निर्माण झाला आहे. संततधार पावसामुळे मुळा धरणात नव्याने पाण्याची आवक सुरू झाली असून काल सायंकाळी सहा वाजता कोतुळ कडून मुळा धरणात येणाऱ्या पाण्याची आवक सुमारे १७,२४३ क्युसेस वेगाने सुरु होती. पावसाचे प्रमाण असेच राहिल्यास आवक अजून वाढण्याची शक्यता आहे. सध्या मुळा धरणात ११,३१८ एम सी एफ टी इतका साठा असून जवळपास ४५% मुळा धरणातील पाणीसाठा झाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पावसामुळे कोतुळकडुन मुळा नदीतून धरणाकडे नव्याने पाण्याची आवक सुरू झाली आहे. सध्या मुळा धरणात सुमारे ४५ टक्क्यांच्या जवळपास पाणीसाठा झाला असून त्यातील उपयुक्त साठा ३० टक्के आहे. मात्र नव्याने पाण्याची आवक सुरू झाल्याने नगर शहरासह राहुरी, नेवासा, पाथर्डी आणि शेवगाव तालुक्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुळा धरणात नव्याने पाण्याचीआवक सुरू झाल्यामुळे धरणाच्या लाभक्षेत्रासह अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांत मुळा धरणाची पातळी अतिशय खालावली होती. धरणाने तळगाठल्यामुळे पिण्याच्या पाण्याची सुद्धा चिंता निर्माण झाली होती. परंतु निसर्गाने साथ दिल्यामुळे काही प्रमाणात पिण्याच्या पाण्याची चिंता कमी झाल्यामुळे नागरिकांना हायसे वाटले आहे. पावसाचे प्रमाण असेच राहिल्यास दोन दिवसात मुळा ५० टक्क्यांच्या च्या पुढे जाऊ शकते. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रवासी व नागरिक काही प्रमाणात समाधानी झाले आहेत.



## नेवासा कृषी कार्यालयाविरोधात शेतकऱ्यांचा संताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शनिशिंगणापूर :** नेवासा तालुका कृषी कार्यालयातील कथित अनियमितता, भ्रष्टाचार आणि शेतकरी योजनांच्या अंमलबजावणीतील हलगर्जीपणाबाबत विविध शेतकरी संघटनांनी अनेक वेळा निवेदने व माहिती अधिकारांतर्गत अर्ज करूनही कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. शेतकरी संघटनांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या विविध कृषी योजनांची पुरेशी माहिती सर्वसामान्य शेतकऱ्यांना दिली जात नसून, काही मोजक्या लाभार्थ्यांनाच योजनांचा लाभ मिळत असल्याचा आरोप आहे. काही दिवसांपूर्वी कार्यालयातील शासकीय कागदपत्रांच्या कथित गैरव्यवहाराबाबतही तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाई होत नसल्याने संशय अधिक बळावल्याचे शेतकरी सांगत आहेत. तसेच कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, कार्यालयीन वेळेचे पालन होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. वारंवार निवेदने देऊनही चौकशी सुरू होत नसल्याने शेतकरी वर्गात असंतोष वाढत आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा कृषिमंत्री व कृषी आयुक्तांकडे दाद मागण्यात येईल, असा इशारा शेतकरी संघटनांनी दिला आहे. तसेच तक्रार करणाऱ्या शेतकरी व पत्रकारांना दबाव टाकला जात असल्याचाही आरोप करण्यात आला असून, प्रशासनाने या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

# भंडारदरा धरण ७५ टक्के भरले



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राजूर :** उत्तर नगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या भंडारदरा धरणाच्या पाणलोटात पावसाचा जोर वाढल्याने भंडारदरा धरणात पाण्याची आवक वाढत आहे. अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या पाणलोटात व परिसरात चार ते पाच दिवसांपासून मुसळधार पावसाचे तांडव सुरूच आहेत. सतत पडत असलेल्या पावसाने आदिवासी बांधवांचे जनजीवन विस्कळीत झाले आहेत. आदिवासी बांधवांवर आपली पाळीव जनावरे घरातच बांधण्याची वेळ आली आहे. पावसामुळे हवेत गारठा तयार झाला असुन, घराघरांमध्ये शेकोट्या पेटल्या आहेत.

मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे काळ्या कातळावरुन पांढऱ्या शुभ्र पाण्याचे धबधबे कोसळत आहेत.

ओढे-नाले दुथडी भरून वाहते झाल्याने भंडारदरा धरणाच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. भंडारदरा धरणाच्या पाणलोटात यावष पाऊस उशिरा दाखल झाल्याने परिसरातील शेतकरी वर्गाच्या पोटात चिंतेचा गोळा आला होता. दुबार पेरणीचे संकट उभे राहिले होते. परंतु पाऊस उशीरा का होईना दाखल झाल्यानंतर भात लागवडी योग्य पाऊस पडत असल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

गत २४ तासात कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे भंडारदरा येथे १२९ मिमी पावसाची नोंद झाली असून घाटघर येथे १८५ मिमी पाऊस पडला. तर पांजरे १६० मी मी. रतनवाडी येथे १७४ मिमी, वाकी येथे १२२ मिमी पाऊस नोंदविला गेला. धरणाचा पाणीसाठा ८१२४ दशलक्ष घनफुटावर पोहचल्याने भंडारदरा धरण ७३.५९ टक्के भरले आहे. असाच पाऊस चालू राहिला तर लवकरच धरण भरण्याची शक्यता वर्तवली जात आहेत.

## शनिशिंगणापूरात खासगी पार्किंगमध्ये तुफान हाणामारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शनिशिंगणापूर :** जगप्रसिद्ध शनिशिंगणापूर येथे रविवारी (दि. २०) सायंकाळी पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या एका खासगी पार्किंग परिसरात दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली. या प्रकाराची परिसरात मोठी चर्चा असून, कोणत्याही पक्षाने अधिकृत फिर्याद न दिल्याने शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात अद्याप कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याची माहिती समोर आली आहे. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, दोन्ही गटांमध्ये काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

**तक्रार नसल्याने गुन्हा दाखल नाही**

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र, प्रकरण पुढे न वाढवता दोन्ही बाजूंमध्ये समेट घडवून आणल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. यासंदर्भात पोलिसांनी कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही. या घटनेनंतर सार्वजनिक ठिकाणी झालेल्या हाणामारीप्रकरणी तक्रार नसल्यास पोलिसांकडून स्वतः हून गुन्हा दाखल करता येतो का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. काही नागरिकांनी या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या घटनेत काही गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचा सहभाग असल्याची चर्चा होत असली, तरी त्यासंदर्भात कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे अशा दाव्यांची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे.जिल्हा पोलीस प्रशासन कायदा व सुव्यवस राखण्यासाठी सातत्याने कारवाई करत असताना शनिशिंगणापूरातील या घटनेमुळे स्थानिक पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. कायद्याची समान अंमलबजावणी होऊन कोणालाही विशेष वागणूक मिळू नये, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## सायबर फसवणुकीचे नगर कनेक्शन उघड

### ४०.६८ लाखांच्या गैरव्यवहाराप्रकरणी गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** देशभरातील नागरिकांची सायबर फसवणूक करून मिळवलेली रक्कम अहिल्यानगर जिल्ह्यातील बँक खात्यांमध्ये जमा करून ती परस्पर काढून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर पोलिसांनी ४० लाख ६८ हजार ५६९ रुपये ४५ पैशांच्या फसवणुकीप्रकरणी अज्ञात खातेधारक व त्यांच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार अमोल नवनाथ आव्हाड यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ ऑगस्ट २०२५ ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत सायबर भामट्यांनी देशभरातील अनेक नागरिकांची ऑनलाइन फसवणूक केली. फसवणुकीतून मिळालेली रक्कम अहिल्यानगर जिल्ह्यातील काही बँक खात्यांमध्ये जमा करण्यात आली होती.

तपासात संबंधित खातेदारांनी व खाती हाताळणाऱ्या स्थानिक व्यक्तींनी चेक व एटीएमच्या माध्यमातून ही रक्कम तात्काळ काढून घेतल्याचे समोर आले आहे. सायबर गुन्हेगारांशी संगनमत करून आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, संशयित आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. या फसवणुकीमागे मोठे सायबर रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून, तपासातून आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे. सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अनोळखी व्यक्तींवर विश्वास न ठेवता बँक व्यवहार व ऑनलाइन व्यवहार करताना अधिक सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## वैजापूर तहसील कार्यालयात कर्मचाऱ्यांची तीव्र कमतरता

### १६४ गावांचा कारभार अवघ्या सात कर्मचाऱ्यांवर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापूर तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांची तीव्र कमतरता प्रशासनासमोर मोठे आव्हान बनली असून, तब्बल १६४ महसुली गावांचा कारभार सध्या प्रत्यक्षात अवघ्या सात कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर सुरू आहे. अनेक पदे दीर्घकाळ रिक्त राहिल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा मोठा ताण पडत असून, त्याचा परिणाम महसूल विभागाच्या दैनंदिन कामकाजावर आणि नागरिकांना मिळणाऱ्या शासकीय सेवांवर होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी मनुष्यबळाच्या कमतरतेबाबत अनेकवेळा जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. मात्र, अद्याप या प्रश्नावर कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. कार्यालयात मंजूर २२ पदांपैकी केवळ ११ पदे भरलेली आहेत. त्यातील सहाय्यक महसूल अधिकारी नारायण राजपूत हे विभागीय चौकशी अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत आहेत, तर सहाय्यक महेश धुमाळ यांची उपविभागीय अधिकारी कार्यालयात प्रतिनियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सहाय्यक राजेंद्र आव्हाड हे मे २०२६ पासून गैरहजर असल्याने प्रत्यक्षात फक्त सात कर्मचारी संपूर्ण कार्यालयाचा कारभार सांभाळत आहेत.

महसूल नोंदी, फेरफार, वारस नोंद, जात, उत्पन्न व रहिवासी दाखले, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी, न्यायालयीन प्रकरणे, निवडणूक व आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या जबाबदाऱ्या मर्यादित कर्मचाऱ्यांवर आल्याने अनेक कामे प्रलंबित राहत आहेत. परिणामी नागरिकांना शासकीय कामांसाठी वारंवार तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याची तक्रार आहे.

कर्मचाऱ्यांवरील वाढत्या कामाच्या ताणामुळे मानसिक तणावही वाढत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांना तातडीने मूळ कार्यालयात परत आणून रिक्त पदे भरावीत, अशी मागणी कर्मचाऱ्यांसह नागरिकांनी केली आहे. मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा होऊन नागरिकांना वेळेत सेवा देणे शक्य होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## झापवाडीत मध्यरात्री घरात घुसून तरुणावर लाकडी दांडक्याने हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील झापवाडी येथे जुन्या वादातून एका तरुणाच्या घरात मध्यरात्री घुसून लाकडी दांडक्याने मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात एका संशयिताविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस) कलम ११८(१), ३५२ आणि ३५१(२)(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिल शहाराम मोरे (वय ३४, रा. झापवाडी, ता. नेवासा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमोल गणपत जरे (रा. झापवाडी, ता. नेवासा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या फिर्यादीनुसार, दि. २१ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी त्यांच्या घरी झोपलेले असताना आरोपी मोठमोठ्याने शिवीगाळ करत त्यांच्या घरासमोर आला. ‘‘तू माझ्याविरोधात पोलिस ठाण्यात तक्रार देतोस काय?‘‘ असा जाब विचारत आरोपीने घरात प्रवेश केला. त्यानंतर लाकडी दांडक्याने फिर्यादीस मारहाण केली. यावेळी आरोपीने ‘‘माझ्या नादी लागलास तर तुला जिवंत सोडणार नाही‘‘ अशी धमकी देत शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. मारहाणीत जखमी झालेल्या फिर्यादीवर सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे उपचार करण्यात आले. फिर्यादीचा जबाब प्राप्त झाल्यानंतर सोनई पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एस.बी.चौधरी करीत आहेत.

## अवैध वाळू साठेबाजांवर महसूल विभागाचा मोठा दणका

**२४ जणांच्या सातबाऱ्यावर ५३.८६ लाखांचा दंडाचा बोजा**

**उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जर्हाड यांची धडक कारवाई**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील पुरणगाव आणि सावखेडगंगा येथे बेकायदेशीररीत्या वाळूचा साठा करून ठेवणाऱ्या २४ जणांविरुद्ध महसूल प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जर्हाड यांनी संबंधितांच्या सातबारा उताऱ्यावर एकूण ५३ लाख ८६ हजार ३६४ रुपयांचा दंडाचा बोजा नोंदविण्याचे आदेश दिले असून, या कारवाईमुळे अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

महसूल विभागाला पुरणगाव व सावखेडगंगा परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू साठा करण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने प्रत्यक्ष पाहणी करून विविध ठिकाणी साठवलेल्या वाळूचे पंचनामे व मोजमाप केले. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या आधारे अवैधरित्या वाळू साठवणाऱ्या २४ जणांची ओळख पटविण्यात आली.

सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटिसा बजावून लेखी खुलासा सादर करण्याची संधी देण्यात आली होती. मात्र, निर्धारित मुदतीत समाधानकारक उत्तर न मिळाल्याने उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जर्हाड यांनी एकतर्फी निर्णय घेत आर्थिक दंडाची कारवाई केली. तसेच संबंधितांच्या सातबारा उताऱ्यावर दंडाची रक्कम बोजा म्हणून नोंदविण्याचे निर्देश दिले.

कारवाईदरम्यान पुरणगाव येथे दोन स्वतंत्र प्रकरणांमध्ये अनुक्रमे ६ जणांवर ५



लाख ४० हजार रुपये आणि ११ जणांवर १८ लाख ४६ हजार ३६४ रुपये दंड ठोठावण्यात आला. तर सावखेडगंगा येथे ७ जणांवर ३० लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला. अशाप्रकारे तीन प्रकरणांमध्ये मिळून ५३ लाख ८६ हजार ३६४ रुपयांचा दंड संबंधितांच्या सातबारा उताऱ्यावर बोजा म्हणून नोंदविण्यात येणार आहे.

महसूल प्रशासनाच्या आदेशानंतर संबंधित गावांतील तलाठ्यांनी सातबारा उताऱ्यावर दंडाची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या नोंदीनंतर संबंधित जमीनधारकांना भविष्यात जमीन खरेदी-विक्री, कर्जप्रकरणे तसेच इतर महसुली व्यवहारांमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

महसूल प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, अवैध वाळू उत्खनन, वाहतूक आणि साठेबाजीविरुद्ध यापुढेही अशाच धडक कारवाया सुरू राहतील. शासनाच्या महसुलाचे नुकसान आणि पर्यावरणाची हानी करणाऱ्यांविरुद्ध कठोर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जर्हाड यांच्या या निर्णायक कारवाईमुळे वैजापूर तालुक्यातील अवैध वाळू व्यवसायाला मोठा धक्का बसल्याची चर्चा असून, बेकायदेशीर वाळू साठेबाजी करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पैशांच्या वादातून मारहाण

### मजुराचे नाक फ्रॅक्चर, दोघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरातील खंडोबानगर परिसरात घरातील पैशांवरून झालेला कौटुंबिक वाद मारहाणीपर्यंत पोहोचला. या घटनेत एका मजुराच्या नाकाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाल्याने वैजापूर पोलिसांनी दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कैलास गजानन गजर (वय ३७, सध्या रा. खंडोबानगर, वैजापूर) हे मजुरी व चणे फोडण्याचा व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. २० जुलै रोजी रात्री सुमारे ८ वाजता ते कामावरून घरी परतल्यानंतर घरात ठेवलेले पैसे जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत पत्नीला विचारणा केल्यानंतर दोघांमध्ये वाद झाला. त्यावेळी पत्नीने तिचा भाचा किशोर शिंदे घरी आला होता, त्यामुळे त्याने पैसे घेतले असावेत, अशी शक्यता व्यक्त केली.

याचवेळी फिर्यादीचे मेहुणे महादेव रंगराव शिंदे तेथे आले. फिर्यादीनुसार, त्यांनी शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर किशोर



महादेव शिंदे यानेही कैलास गजर यांच्या चेहऱ्यावर व नाकावर ठोसे मारल्याने त्यांच्या नाकातून रक्तस्राव झाला.आरडाओरडा ऐकून कुटुंबीय व परिसरातील नागरिकांनी धाव घेऊन भांडण सोडविले. जखमी कैलास गजर यांनी वैजापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. शासकीय रुग्णालयात करण्यात आलेल्या वैद्यकीय तपासणी व सीटी स्कॅनमध्ये त्यांच्या नाकाला फ्रॅक्चर झाल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी वैजापूर पोलिसांनी महादेव रंगराव शिंदे व किशोर महादेव शिंदे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सोयाबीन बियाणे निकृष्ट ?

**‘फुले संगम’ वाण उगवलेच नाही; नुकसानभरपाई न मिळाल्यास शेतकऱ्याचा उपोषणाचा इशारा**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या 'फुले संगम' या सोयाबीन वाणाच्या बियाण्यांबाबत गंभीर तक्रार समोर आली आहे. श्रीरामपूर तालुक्यातील कान्हेगाव येथील प्रगतशील शेतकरी विलास दगडू तुपे यांनी विद्यापीठाकडून खरेदी केलेले बियाणे पेरल्यानंतर तब्बल १४ दिवस उलटूनही उगवण झाली नसल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे दुबार पेरणीचे संकट ओढवून आर्थिक नुकसान झाल्याने संबंधितांवर कारवाई करून नुकसानभरपाई द्यावी, अन्यथा उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.




विलास तुपे यांनी खरीप हंगाम २०२६ साठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे 'फुले संगम' या वाणाचे दोन बॅग बियाणे खरेदी करून दोन एकर क्षेत्रात पेरणी केली होती. मात्र, नियोजित कालावधी उलटूनही बियाण्यांची उगवण झाली नाही. विशेष म्हणजे, त्याच शेतातील दुसऱ्या कंपनीचे सोयाबीन बियाणे समाधानकारकपणे उगवल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणी शेतकरी विलास तुपे यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, श्रीरामपूर पंचायत समिती कृषी विभाग तसेच श्रीरामपूर तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित बियाण्यांची तपासणी करून झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई मिळावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

नुकसानभरपाईबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा विलास तुपे यांनी दिला असून, या प्रकरणाकडे कृषी विभाग आणि विद्यापीठ प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

## विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ संगमनेरात विराट मशाल मोर्चा ;केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ काँग्रेस नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेरात मंगळवारी विराट मशाल मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारो युवक, विद्यार्थी, महिला व नागरिक सहभागी झाले. केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलनकर्त्यांनी पंतप्रधान, गृहमंत्री आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

संगमनेर बसस्थानकापासून महात्मा फुले स्मारकापर्यंत निघालेल्या मोर्चापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. मोर्चात विविध समविचारी पक्ष व संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या



संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी बाळासाहेब थोरातम्हणाले, विद्यार्थ्यांचे आंदोलन लाठीमार करून दडपण्याचा प्रयत्न हा लोकशाहीविरोधी असून हुकूमशाहीची प्रवृत्ती दर्शविणारा आहे. जंतर-मंतरवरील आंदोलनासह देशातील युवकांच्या प्रश्नांकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करत आहे. लोकशाही संस्था, न्यायव्यवस्था आणि पत्रकारितेवर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यघटना आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी युवकांनी पुन्हा एकदा संघर्षासाठी तयार राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचा उल्लेख करत केंद्र सरकारवर टीका केली. विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ला दुर्दैवी असून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

मोर्चात माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे अमोल बोराडे, वंचित बहुजन आघाडीचे अजित ओरा, छात्रभारतीचे तुषार पानसरे, अ‍ॅड. रंजना गवांदे, अनुराधा आहेर यांच्यासह विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि हजारो नागरिक सहभागी झाले होते.

मोर्चामुळे संगमनेर शहरातील प्रमुख मार्गांवर काही काळ उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत व्यापक जनजागृतीचा संदेश देण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.